RNI No. MPMAR2013/59929

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र

# बृहन माय मराठी

वर्ष 5 अंक 1, एप्रिल-जुन 2018

www.bmmindia.org.in



लोकसभा अध्यक्षा श्रीमती सुमित्रा महाजन ताई व मंडळाचे पदाधिकारी समवेत नवनिर्वाचित कार्याध्यक्ष श्री मिलिंद महाजन

महाराष्ट्राचे राज्यपाल माननीय श्री विद्यासागर राव यांची मुम्बई येथे कार्याध्यक्ष मिलिंद महाजन यांनी भेंट घेतली. श्री राव यांनी बृहन्महाराष्ट्र मंडळा विषयी माहिती घेतली व श्री महाजन यांचे अभिनंदन केले.

मंडळाच्या प्रतिनिधि मंडळानी श्री मिलिंद महाजन यांचा नेतृत्त्वात छत्तीसगढचे मुख्यमंत्री श्री रमणसिंह यांना सौजन्य भेंट दिली. या प्रसंगी श्री सिंह यांनी छत्तीसगढ येथे मराठी अकादमी स्थापन संबंधी व रायपुर महाराज समाज देणगी संबंधी निश्चित कार्ययोजना संबंधी माहिती दिली.

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे संलग्न संस्थांच्या समस्याना उचित समाधान मिळवून देण्याच्या हेतूने कार्याध्यक्ष श्री मिलिंद महाजन प्रधान कार्यवाह श्री दिलीप कुंभोजकर व कोषाध्यक्ष श्री गोपालकृष्ण दातार यांनी केन्द्रीय मनुष्य व विकास मंत्री श्री प्रकाश जावडेकर यांची भेंट घेतली.

कार्याध्यक्ष श्री मिलिंद महाजन यांनी प्रधान कार्यवाह श्री दिलीप कुंभोजकर, सहकोषाध्यक्ष श्री अशोक कापूरे, संपादक श्री अश्विन खरे, यशोवर्धन फाटक, श्री संजय जोशी व वीणाताई घाणेकर ( आईएएस ) व प्रतिनिधि मंडळ यांनी मध्यप्रदेशचे यशस्वी मुख्यमंत्री श्री शिवराजसिंह चौहान यांची सौजन्य भेंट घेतली या प्रसंगी श्री चौहान यांनी मिलिंद महाजन यांना त्यांचा कारकीर्दी साठी खूप-खूप शुभेच्छा दिल्या.

मंडळाचे पूर्व कार्याध्यक्ष श्री संजय पांडे यांनी कार्याध्यक्ष मिलिंद महाजन यांचे अभिनंदन केले

5 एप्रिल हैदराबाद मंडळाचा वर्धापन निमित्त कार्याध्यक्ष मिलिंद महाजन सोबत हैदराबाद न्यू सीटीचे कमिश्नर श्री महेश भागवत.

25 मार्च रोजी निवृत्तमान कार्याध्यक्ष श्री विलास बुचके व प्रधान कार्यवाह डॉ. रवि गिन्हे यांनी कार्याध्यक्ष मिलिंद महाजन यांचे स्वागत केले

RNI No. MPMAR2013/59929

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र

# बृहन माय मराठी

वर्ष 5 अंक 1, एप्रिल-जुन 2018

www.bmmindia.org.in

**पदसिद्ध अध्यक्ष**
मा. श्री देवेन्द्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

**कार्याध्यक्ष**
श्री मिलिंद महाजन

**प्रधान कार्यवाह**
श्री दिलीप कुंभोजकर

**सल्लागार मंडळ**
**श्री जगदीश उपासने,**
कुलपती माखनलाल विश्वविद्यालय
**श्री सूर्यकांत कुलकर्णी,**
जेष्ठ सभासद, बृहन्महाराष्ट्र मंडळ
**सुश्री रेखाताई दिघे,**
वरिष्ठ पत्रकार व सचिव जागतिक मराठी परिषद
**श्री प्रशांत पोळ,**
विचारक, प्रखर वक्ते, लेखक, जबलपूर
**डॉ अजय वैद्य,**
साहित्यिक ,पत्रकार पणजी गोवा

प्रकाशक
**बृहन्महाराष्ट्र मंडळ**
(मध्यवर्ती संघटना) नवी दिल्ली

संपादक
**अश्विन खरे**

**संपादक मंडळ :**
सुश्री विनिता धर्म, इंदोर
विजय पितरे, जयपूर
हरीश माहूरकर, अहमदाबाद
कांचन जतकर, हैदराबाद
रामदास जोगळेकर, रायपूर

**संपादकीय कार्यालय**
132, टिळक पथ, इंदौर 452 004
मोबा. 09425056423 email :
khare.ashvin@gmail.com
maaymarathi@bmmindia.org.in

## सादर आमंत्रण

**दिनांक 04/08/2018**

**सकाळी 10. 30 वाजता**

*इंदूर येथे बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या*
*कार्यकारिणीची द्वितीय बैठक.*

●

**संध्याकाळी 6वाजता**

*माळवा प्रान्तातील संलग्न व संलग्न होण्यासाठी इच्छुक*
*संस्थांच्या प्रतिनिधीची मंडळ कार्यकारिणी सोबत चर्चा.*

**दिनांक 05/08/2018**

**सकाळी 11 वाजता**

**मराठी प्रश्न मंच**

*मराठी भाषा व संस्कृती ज्ञान परीक्षा अंतर्गत एक*
*आगळा कार्यक्रम संयोजक -श्री विजय फगरे, भोपाळ*

●

**दुपारी 2 वाजता**

*मराठी भाषा व संस्कृती ज्ञान परीक्षा 2017 चा बक्षीस समारंभ*
*प्रमुख पाहुणे **श्री अजय बर्वे,** आं. प्रबंधक, बॅंक ऑफ महाराष्ट्र*
*प्रमुख पाहुणे **श्री गिरीश पतके,***
*कार्यासन अधिकारी, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई*

**प्रशासकीय कार्यालय - बृहन्महाराष्ट्र मंडळ, नवी दिल्ली,** 10056, मुल्तानी ढांडा, पहाडगंज पोलीस स्टेशन समोर, पहाडगंज, नवी दिल्ली - 110055 फोन नं. 011-23523595 मोबा. 09968281918

**खासगी वितरणासाठी**

**या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतातच असे नाही.**

अध्यक्ष पदेन
**मा. श्री देवेन्द्र फडणवीस**
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

**मिलिंद महाजन**
कार्याध्यक्ष
68, मनीषपुरी, साकेत, इंदूर; मध्य प्रदेश
09425065111
milind.bmm@gmail.com

**प्रदीप नारायण कुलकर्णी**
उपाध्यक्ष
302, गणेश वंदन, 347, नेहरु रोड, टिळकवाडी,
बेळगांव, - 590006
09448635693 , 0831-2464280
pradeepnk12@gmail.com

**दिलीप मनोहर कुंभोजकर**
प्रधान कार्यवाह
''शाकम्भरी'' 19, सुधा विहार कॉलनी,
रामपुर, जबलपुर-482008
09479639831 , 0761-2666253
dilipkumbhojkar@gmail.com

**जी.के. दातार**
कोषाध्यक्ष
3.4.526/3, फ्लेट नं. 402, डॉक्टर्स रेसिडेंसी,
बँक ऑफबडौदा च्या समोर, नारायणगुडा,
हैद्राबाद - 27
09440050567
gkd1951@gmail.com

**दीपक कर्पे**
कार्यवाह
''परिश्रम'' 4, एम.आई.जी.
सिविल लाईन्स, सदाशिव नगर,
देवास, मध्य प्रदेश 455001
09425049554, 07272-253223
deepakbkarpe@gmail.com

**अशोक बाबुराव कापुरे**
सह-कोषाध्यक्ष
बी/123, नम्रता टेनामेन्ट, पारसनगर जवळ, वटवारोड, ईसनपूर, अहमदाबाद-382443; गुजरात 09998736713, 08160583029
abkapure13@gmail.com

# विभागीय कार्यवाह

**वसंत बुधकर**
विभागीय कार्यवाह उत्तरांचल
हरिद्वार 09412025894
vasant.budhkar@gmail.com

**संजय बाळकृष्ण तळवलकर**
विभागीय कार्यवाह उत्तरप्रदेश
123, नरसिंग राव टौरिया, डॉ. राजेन्द्र प्रसाद कन्या इंटर कॉलेज जवळ, झाँशी-284002
09450041315, 07007825453
sanjaytalwalkar71@gmail.com

**विनित देव**
विभागीय क़ार्यवाह महाकौशल
307, लक्ष्मीपुरा, सागर, मध्य प्रदेश - 470002
09425172279 , 09165279179 07582-268992
vineetdeo71@gmail.com

**निशा कुलकर्णी**
विभागीय कार्यवाह
दिल्ली, हरियाणा, पंजाब
51/5, दिवाण भवन, देशबंधु गुप्ता रोड,
देव नगर, नवी दिल्ली - 110005
09818335058, 011-28712682
gbkulkarni82@hotmail.com

**शैलेष कुमार लिमये**
विभागीय कार्यवाह तामिलनाडू (चेन्नई)
430, टीटीके रोड, अविंरपेट, चेन्नई - 600018
वाट्सएप नं. : 09840054620, 044 24340085
sslimaye@gmail.com

**दीपक लेले**
विभागीय कार्यवाह राजस्थान
206, नानक टॉवर, न्यू पोस्ट ऑफिस रोड,
कोटा-324002
09785480603, 635051, 7072
dvlele84@gmail.com

**आनंद झारे**
विभागीय कार्यवाह माळवा
167, लोकमान्य नगर, इंदूर-452009 मध्य प्रदेश
09826070756, 0731-2469756
anandzare21@gmail.com

**अरविंद जोशी**
विभागीय कार्यवाह छत्तिसगढ
जोशी एंटरप्राईझेस 845/846,
सी.जी.एच.एस.जी. कॉलोनी,
साड्डू, रायपुर-492007 (छत्तिसगढ)
09425206133 (कार्य) 07712104162
joshiraipur@gmail.com

**पुष्पा धोटे**
विभागीय क़ार्यवाह पूर्वांचल
''पारस'' अपाटज़्मेंट, प्लॅट 1 बी,
1/1 चक्रबेरिया लेन, कोलकाता - 20
09830222219 , 033-24864862
nirajdhote@gmail.com

**लक्ष्मण बुचके**
विभागीय कार्यवाह उत्तर मध्यप्रदेश
20 ए, न्यू शांतिनगर, नई सड़क,
लश्कर ग्वाल्हेर, मध्य प्रदेश 474001
09926535580, 0751-2329876
lbuchke@gmail.com

**पंकज तावडे**
विभागीय कार्यवाह गुजरात
''राघेय'' 218/ई, ओम नगर,
चीतल रोड, अमरेली- 365601 गुजरात
वाट्सएप नं. : 09737169813, 09428469813
tavdepankaj101@gmail.com

**प्रभाक़र कोरडे**
विभागीय कार्यवाह आंध्रप्रदेश
घर नं. 17-2-628/37, ए. साईदाबाद, हैद्राबाद
तेलंगाणा 09490117188, 040-24525458

**राजन कडकडे**
विभागीय कार्यवाह गोवा
घर नं. 44, प्रभाग नं. 9,
डिचोलीं, गोवा 09423883880
rajankadkade@gmail.com

**नितीन कपिलेश्वरकर**
विभागीय कार्यवाह कर्नाटक
घर नं. 1366, बसवाण गर्ली, बेळगाव-590001
09886791433, 0831-2426062

# संपादकीय

**सन्माननीय सभासद, सप्रेम नमस्कार,**

मराठी माणूस म्हटलं की त्याच्या चारित्र्यातील सर्व गुण-अवगुणांसकट, क्रियाशील असा झटणाऱ्या व आपली नाती व संस्कृतीबद्दल, आपल्या समाजासाठी आपुलकी आणि अभिमान बाळगणाऱ्या व्यक्तीची प्रतिमा सामोरी येते. अशा आपण सर्व बंधु भगिनींचे, बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे प्रकाशित होणाऱ्या 'वृहन माय मराठी' च्या नव्या अंकाच्या माध्यमातून मनापासून स्वागत व अभिनंदन करीत आहोत. भारतातल्या सर्व अमराठी प्रांतात नेटाने संगठीत प्रयत्न करणारी संस्था अशी आपल्या बृहन्महाराष्ट्र मंडळ ह्या संस्थेची ओळख आहे. ऐतिहासिक कारणाने उत्तर भारतात स्थलांतर झाल्याने व वेगवगेळ्या प्रातांत स्थायी निवासी झाल्याने मराठी भाषिकांच्या परस्पर संबंधात सतत समन्वय साधण्याच्या हेतूने वर्ष 1926साली बृहन्महाराष्ट्र मंडळाची स्थापना करण्यात आली होती. कोणतीही संस्था तेव्हांच उन्नती करते जेव्हां त्या संस्थेलासंचालित करणाऱ्या किंवा क्रियाशील ठेवणाऱ्यांच्या वतीनं केले जाणारे समस्तकार्य सभासदांच्या अपेक्षानुसार सर्वांच्या हिताचे असते.

नुकतेच गोवा येथे संपन्न झालेल्या 68व्या अधिवेशनात होऊ घातलेल्या निवडणूकांमध्ये हे चित्र प्रकर्षाने आपण सर्वांनीच अनुभविले. सभासदांनी मंडळाच्या कार्यात उद्दिष्टांनुरूपवाढ व्हावी म्हणून नवे कार्यकारी मंडळ निवडून आणले. 5 एप्रिल 2018पासून या नवीन मंडळाने आपल्या नवीन योजनांना आकार देण्यास सुरुवात केलीआहे . नवनिर्वाचित कार्याध्यक्ष श्री मिलिंद महाजन यांनी स्पष्ट केले आहे कि जोवर बृहन्महाराष्ट्र मंडळाशी संलग्न असलेल्या संस्था सशक्त होत नाहीत तो पर्यंत बृहन्महाराष्ट्रांतीलमराठी भाषिकांचे सशक्तीकरण होणार नाही म्हणून नवीन कार्यकारिणी चा भर बृहन्महाराष्ट्र मंडळाला सर्व दृष्ट्या सशक्त करण्यावर जास्त राहील जेणे करून संलग्न संस्थांना त्यांच्या समस्या आणि अडचणींचे समाधान मिळवून देण्यास सोपं होईल. ह्याचआपल्या ध्येयाला जागून नवनिर्वाचित कार्याध्यक्ष श्री मिलिंद महाजन यांनी नुकत्याच 'ओरिएन्टल कॉलेज,मराठी महाविद्यालय, हैदराबाद' आणि तसेच महाराष्ट्र मंडळ रायपुर या संस्थां करिता अनुक्रमे केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री मा.ना. श्री प्रकाश जावडेकर आणि मुख्यमंत्री छत्तीसगढ डॉ. रमण सिंग यांची भेट घेतली होती. मराठी महाविद्यालय, हैदराबाद याला मराठी विद्यार्थी नसल्याचे कारण दाखवून तेलंगण शासनाने नुकतेच मिळत असलेले अनुदान पूर्णपणे समाप्त केले होते. श्री महाजन यांच्या प्रयासाने मराठी महाविद्यालयाचे अनुदान पुन: प्रारंभ झाले आहे तर डॉ. रमण सिंह यांनी छत्तीसगढ येथे लवकरात लवकर मराठी अकादमी स्थापित करण्याबद्दल श्री मिलिंद महाजन यांना आश्वस्त केले आहे. तसेच महाराष्ट्र मंडळ रायपुरला पूर्वघोषित अनुदान लवकरच भुगतान करण्याचे आदेश देखील दिले आहेत ज्या संबंधात शासकीय स्तरावर कारवाई प्रारंभ झाल्याचे कळते . ह्या प्रयासांची मुद्दाम इथं नोंद हा संदेश स्पष्ट करण्यासाठी कि बृहन्महाराष्ट्र मंडळातील मराठी भाषिकांसाठी आमच्यातर्फे प्रयत्न तर होतीलच पण त्याहून जास्त हिरीरिने संलग्नसंस्थांकरितादेखील कार्य केले जाईल जेणे करून आणखी संस्था बृहन्महाराष्ट्र मंडळाशी जोडता येण्याचा मार्ग सोपा होईल.

बृहन्महाराष्ट्र मंडळ ही मराठी भाषिकांची महाराष्ट्र बाहेरील शिखर संस्था आहे. तिचे सार्वजनिक स्वरूप लक्षात घेता बृहन्महाराष्ट्रात असलेल्या मंत्रीगण, खासदार, आमदार, नगरसेवक, आय.ए.एस. तथा निरनिराळ्या क्षेत्रातील नामांकित व्यक्तींना बृहन्महाराष्ट्र मंडळाचे हितचिंतक/आजीव सभासद करून या चळवळीशी संलग्न करण्याचा प्रयत्न आहे. पुढे बृहन्महाराष्ट्र मंडळा 100 वर्षे पूर्ण होणार आहेत .त्यासाठी पूर्व तयारी म्हणून साधनं गोळा करण्याचे कार्य हाती घेण्यात येईल. कार्य विस्ताराकरीता बृहन्महाराष्ट्रात सुमारे 1 हजारहून जास्त संस्था कार्यरत आहेत. अशा मराठी संस्थांना सभासद करून घेणे गरजेचे आहे. कार्याध्यक्ष श्री मिलिंद महाजन यांनी आपल्या प्रस्तावित निवेदनात स्वत:चे व कार्यकारिणीच्या कामाविषयी खुलासेवार मनोगत व्यक्त केले आहे. त्यांच्याच शब्दात सांगायचे झाले तर, 'ह्यापुढे बृहन्महाराष्ट्र मंडळाला पुढे कसे आणायचे आणि पुढे कसे घेऊन जायचे ह्या सबंधीचा दृष्टीकोण आम्ही स्पष्टपणे मांडायचा प्रयत्न केलाय तरी या संदर्भात आपल्या सूचना आणि सल्ला ,ईमेल, संकेतस्थळ, व्हॉटसप्पच्या माध्यमातून पाठवले जाऊ शकतात . आपल्या सूचनांची योग्य ती दखल घेण्यात येईलच. उपस्थित आव्हान पेलायला थोडं जड असेल पण अशक्य नाही. या बाबतीत सर्वांनाच थोडा चाकोरी बाहेर देखील विचार करावा लागेल असे आमचे मत आहे. समर्थांनी सांगितल्या प्रमाणे - सामर्थ्य आहे चळवळीचे , जो जे करील तयाचे .... अधिष्ठान पाहिजे. विचार ठेवून हळु - हळु प्रगती करू व जितके शक्य असल्यास मंडळाचे उद्देश्य कसे साधले जाईल याचा प्रयत्न राहील. बृहन् मायमराठी हे बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र आहे व आपणाशी संवाद साधण्याचे एक साधन. हे अधिक प्रभावी व्हावे व ते नियमित पणे आपणास प्राप्त व्हावे या दृष्टीने सभासद फक्त एक शुभेच्छा जाहिरात पण प्रकाशित करायला देऊन आम्हाला आपले सहकार्य देऊ शकतात. शुभेच्छा जाहिरातीसाठी अगदी स्वस्त: आणि माफक दर म्हणजे फक्त पांचशे रुपये अशी ठेवण्यात आली आहे. जेणे करून संस्थेसाठी व बृहन्महाराष्ट्रातल्या मराठी बांधवांच्या कल्याणा साठी प्रत्येकाचे हातभार लागतील व अंक देखील नियमित प्रकाशित होण्यास मदत मिळेल. शुभेच्छा.

**अश्विन खरे**
संपादक

# महाराष्ट्र गौरव गान

।। जय जय जय महाराष्ट्र ।।
पुण्यभूमि ही, महाराष्ट्राची, धन्य धन्य ही, धन्य धन्य ही,
धन्य ही भूमि आहे अपुल्या महाराष्ट्राची,
थोर मुनिजन वीर प्रतापी, पूज्य साधु संतांची ।। धृ ।।

जय अष्ट विनायक पंढरपूर, जय जेजुरी जय गाणगापूर।
कोल्हापूर जय जय तुळजापूर, बैजनाथ जय जय माहुर।।
जय शिंगणापूर शेगांव शिर्डी, जय जय नरसोबाची वाडी।।
जय मुंबादेवी मुंबईची, सप्तश्रृंगी डोंगरावरची।।
देहू, आळंदी, नाशिक, पैंठण, अनेक ह्या, अनेक ह्या,
अनेक ह्या तीर्थांची ।।1 ।। धन्य

संत ज्ञानेश्वर तुका, जनाबाई, एकनाथ नामा मुक्ताई।
पुंडलिक, सावता, गोरोबा, रामदास, नरहरि, चोखोबा।।
चांगदेव आणि सजन कसाई, कान्होपात्रा श्री सखुबाई।
गाडगे तुकड्या व दामाजी, निवृत्ति, सोपान, गोमाजी।।
संत जन्मले अनेक किती हो,
गजर-जय जय विठ्ठल जय हरि विठ्ठल....
संत जन्मले अनेक किती हो, धर्मभूमि, धर्मभूमि,
धर्मभूमि संताची ।।2 ।।

कुसुमाग्रज, ठोंबरे, शेळके, शांताराम व्ही, बाबा फाळके।
जोशी, अभिषेकी, गन्धर्व, देशपांडे, मंगेशकर सर्व।।
दारव्हेकर, खेबुडकर, फडके, तांबे, कानेटकर, अत्रे, कोंडके।
सचिन तेंडुलकर आणि गावस्कर, जयंत नारळीकर, श्री किर्लोस्कर।।
खेळ, साहित्य, संगीत, औद्योगिक, जननी, ही जननी,
जननी असे सर्वांची ।।3 ।। धन्य

धर्म रक्षक श्री शिवराजे, संभाजींची किर्ती गाजे।
बाजीप्रभु, शेलार, पेशवा, राणी झांशीला तुम्ही आठवा।
टिळक, गोखले, वीर सावरकर, फुले ज्योतिबा, श्री आगरकर।
कर्वे, राजगुरु, गोळवळकर, साने गुरुजी, आंबेडकर।।
शाहीर गाई पोवाडे हो, (कोरस) जी जी रं, जी, जी जी
शाहीर गाई पोवाडे ही, गाथा, ही गाथा, अहो गाथा,
वीरत्वांची।।4 ।। धन्य
विदर्भ, कोंकण, कराड, सांगली, खानदेश ही क्षेत्रे चांगली।
नद्या गोदावरी, भीमा, कृष्णा, विंध्य सहयाद्री डोंगर रचना।।
रम्य स्थळे श्री महाबळेश्वर, माथेरान, लोणावळा सुंदर।।
ऍलीफेन्टा अजिंठ्यांची, लेणी दिव्य एलोऱ्यांची।।
बाग बगीचे, मळे शेती ही, धरणी, ही धरणी,
धन धान्यांची ।।5 ।। धन्य

लावण्या, गोंधळी, नाट्य् तमाशे, अभंग, भारूड, कोळी गीते।
ओव्यां, गवळणी, भावगीते ही, पारम्परिक लोकगीते ही।।
गीता रहस्य, गीत रामायण, गुढीपाडवा, पोळा हे सण।
जाणताराजा, एकच प्याला, पालख्या, दिंडया, गोपाळ काला।
विविध सभ्यता, कला संस्कृति, पावन, अति पावन,
अहो पावन संस्काराची ।।6 ।। धन्य

पुण्य भूमि ही महाराष्ट्राची, भाषा मराठी ही देवांची।
माय बोली ही आहे रसाळ, गोड गोड ही अति जिव्हाळ।।
मायभूमि ही अपुली पावन, श्रेष्ठ सभ्यता, संस्कृति जीवन
मराठा तितुका मेळवावा, धर्म मराठी वाढवावा।
'ऋषि' वर्णितो गौरव गाथा अपुल्या,
अहो, अपुल्या मायभूमिची।।7 ।। धन्य

**- रमेश भावसार, देवास ( माळवा )**

## सभासद वर्गणी

| | |
|---|---|
| संरक्षक व्यक्ती सभासद | रु. ५,०००/- (किंवा अधिक एकावेळेस) |
| आजीव व्यक्ती सभासद | रु. १,०००/- (एकावेळेस) |
| व्यक्ती साधारण सभासद | रु. १००/- वार्षिक |
| संस्था संलग्नता दीर्घकालीन सभासद | रु. २,०००/- (पंधरा वर्षाकरिता) |
| संस्था संलग्नता वार्षिक सभासद | रु. २००/- |

# कार्याध्यक्षांचे मनोगत

**प्रिय सन्माननीय सभासदमंडळी**

**आपणा सर्वांना माझा सप्रेम नमस्कार**

सर्वप्रथम गोवा निवडणूक अधिवेशनात आपण मला आणि माझ्या सहकाऱ्यांना भरपूर पाठिंबा देऊन निवडून आणल्याबद्दल आपणा सर्वांच्या प्रति मन:पूर्वक आभार व्यक्त करू इच्छितो. आपल्या पैकी बऱ्याच लोकांशी गोवा निवडणूक दरम्यान किंवा निवडणुकी नंतर माझा अनौपचारिक संवाद झालेला आहे . पण काही लोकांशी हा माझा पहिलाच संवाद आहे. निवडणूक निमित्ताने माझे बऱ्याच प्रांतात फिरणे झाले. तेथे आणि तसेच गोवा येथे सुद्धा माझे बऱ्याच सभासदांशी बोलणे झाले. बृहन्महाराष्ट्र मंडळाचा भावी कार्याध्यक्ष म्हणून खूप सभासदांनी आपले मत, आपले म्हणणे आणि तसेच त्यांच्या बृहन्महाराष्ट्र मंडळाकडून असलेल्या अपेक्षा माझ्या पर्यंत पोहोचविल्या आहेत. ह्या संपर्कात मला एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली जिला वेगवेगळ्या सभासदांनी दुजोरा ही दिला आणि ती म्हणजे, बृहन्महाराष्ट्र मंडळ मागील काही वर्षांत राष्ट्रीय पातळी वर आपले तेजोवलय हरवून बसलंय. महाराष्ट्रा बाहेरील महाराष्ट्रीय जनांचा राष्ट्रीय पातळीवर एकमेव संस्थागत आवाज असून देखील मंडळाला हवी तशी प्रसिद्धी आणि हवा तसा वचक निर्माण नाहीं करता आला. ही खंत जशी इतर सभासदांना वाटते तशीच ती मला देखील वाटते. काहीही झालं तरी योग्य गोष्टींवर सरकार दरबारी आपला आवाज पोहोचलाच पाहिजे एवढी धमक बृहन्महाराष्ट्र मंडळात असलीच पाहिजे. मला माहित आहे कि हे एक दिवसाचे किंवा दोन-तीन वर्षाचे काम नाही, हे सतत प्रयासाने संस्था बळकट झाल्यावरच होऊ शकेल. तरी माझे प्रयत्न याच दिशेने असणार आहेत ह्याची हमी मी आपणा सर्वांस देऊ इच्छितो. सभासद हो, 25 मार्च 2018रोजी नवीन कार्यकारिणी ने कार्यभार ग्रहण केला आणि लगेच दिनांक 5 एप्रिलला स्थापना दिवसा चा सुयोग साधून विस्तारित कार्यकारिणीची बैठक हैदराबाद येथे संपन्न झाली. ह्या बैठकीत बऱ्याच मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली आणि भविष्यात आपल्याला संस्थेस कुठे घेऊन जायचे आहे त्या संबंधी बरेच निर्णय घेण्यात आले.

सभासद आणि संस्था ह्यांचे दरम्यान नेहेमी संवाद असावा, सभासदांना संस्थे संबंधीची, बैठका आणि निर्णय संबंधीची प्रत्येक माहिती शक्यतो लवकर मिळायला हवी आणि तसेच सभासदांना देखील आपले म्हणणे कार्यकारिणी पर्यंत पोहोचाविण्यास माध्यम उपलब्ध हवे. ह्याचीच दाखल घेऊन मंडळाचे सुधारित संकेतस्थळ इंटरनेट वर कायम करण्यात आले आहे.

सभासद संवाद - ह्या विकल्पाच्या माध्यमातून तसेच 8989792200 ह्या व्हाट्सप्प नंबर वर समस्त सभासद आपला संदेश कार्यकारिणी पर्यंत प्रेषित करू शकतात. ह्या शिवाय ईमेल हे माध्यम तर आहेच. ह्या प्रक्रियेत काही महत्वाच्या किंवा लक्षवेधी सूचना प्राप्त सभासदां कडून झाल्या तर त्या विचारार्थ सुद्धा घेतल्या जाऊ शकतात.

बृहन्महाराष्ट्र मंडळ हे मुळात मराठी भाषिकांच्या संस्थांचे आणि त्यांच्या मार्फत मराठी भाषिकांचे प्रतिनिधित्व करणारी संस्था आहे, पण माझ्या असे लक्षात आले आहे कि मागील काही वर्षात ज्या प्रमाणात व्यक्तिगत आजीव सदस्य बनविले गेले त्या प्रमाणात संस्थागत

सदस्यांचे प्रमाण नाही वाढले. तरी ही विसंगती दूर करण्याची गरज लक्षात घेऊन काही काळ सर्व लक्ष संस्थागत सदस्यतेवर राहील.

दुसरा एक महत्वाचा मुद्दा म्हणजे सांप्रत मंडळाची आर्थिक परिस्थिती. जानेवारीत संपन्न झालेल्या गोवा अधिवेशनाचा जमा खर्च बघता असे लक्षात आले कि मंडळाच्या आर्थिक व्यवहारांचे नियोजन आणि प्रबंधन सुरळीत नाही. अंदाजपत्रक किती आणि खर्च किती यातले तारतम्य दृष्टीस पडत नाही. येथे मी स्पष्ट करू इच्छितो कि माझा रोख मागील कार्यकारिणी किंवा कोणा एका व्यक्तीस दोषी ठरविण्याचा बिलकुल नाहीये पण आता पर्यंत मागीलमोठ्या कालखंडात संस्थेची गंगाजळी वाढविण्याचा किंवा आर्थिक आत्मनिर्भरता प्राप्त करण्याचा फारसा प्रयत्न झालेला दिसत नाही. काही ठिकाणी नवीन प्रकल्पांचे सुतोवाच जरूर झाले पण त्यानंतरचा पाठपुरावा बिलकुल केला गेला नाही. आज ही मंडळ आपल्या गरजा भागविण्या करिता सदनिकेचे आणि व्याजाचे उत्पन्न यावरच बहुतांशी अवलंबून आहे. अधिवेशने, सम्मेलने, माय मराठी मुखपत्र हे कायम स्वरूपाचे मिळकतीचे साधन असले पाहिजे पण दुर्दैवाने अशी परिस्थिती नाहीये.

अधिवेशने आणि सम्मेलने हे तर द्रव्य गळती चे पर्याय झाले आहेत. अशा निराशाजनक परिस्थिती मधून संस्थेला बाहेर काढण्याचे पूर्ण प्रयत्न सर्वांनाच करावे लागणार आहेत. याच संदर्भात कार्यकारिणीने महाकोष योजना स्थापित केली आहे तरी आपण सर्वांनी ह्या योजनेस हात भार लावावा ही विनंती. योजनेचा तपशील संकेतस्थळावर बघता येईल.तसेच आपल्या संस्थेला प्राप्त होणाऱ्या सर्व देणग्यांवर प्राप्ती कर खात्या कडून कलम 80 त्र अंतर्गत सवलत मिळवून घेण्या साठी पण प्रयत्न करीत आहोत.

सभासद हो,माझादृढ विश्वास आहे कि पारदर्शिता आणि जबाबदारी अर्थात Transperancy and Accountability हे दोन्ही कुठल्याहीसामाजिक संस्थेच्या सुचारू संचालना करितामुख्य आधार म्हणून काम करत असतात. ही दोन्ही तत्त्वें सभासदांना कार्यकारिणीच्या जवळ आणून सोडतात आणि परोक्ष रित्या सभासदांना निर्णय प्रक्रियेत देखील सामील करून घेतात. आपल्या कार्यपद्धतीत पारदर्शिता आणण्यासाठी माझा आग्रह आणि प्रयत्न असणार आहे कि या पुढे सर्व महत्वपूर्ण निर्णय, सूचना आणि बैठकींचा अहवाल (अपुष्ट किंवा पुष्टीकरण झालेला अशा टिपणा सह) आपल्या इंटरनेट संकेत स्थळावर सभासदांच्यामाहिती करिता उपलब्ध केला जाईल.

सभासद हो,कुठल्याही संस्थेची प्रगती एका मुख्य सिद्धांतावर आधारित असते आणि तो म्हणजे बदलत्या काळाच्या गरजेनुरूप ती संस्था स्वत:ला कितपत बदलू शकते आणि आपल्या प्रगतीचा वेग वाढवू शकते.हे सर्व साध्य करायचे झाले तर संस्थांच्या बद्दल दोन गोष्टी बघाव्या लागतात. एक तर त्या संस्थेची घटना किती लवचिक आहे कि काळानुरूप किती बदल करावयाची परवानगी देते आणि दुसरी म्हणजे आवश्यक बदल करण्यास घटनेची दुरुस्ती किती लवकर केली जाऊ शकते. संस्थेच्या प्रगती साठी ह्या पैकी किमान एक तरी घटक आवश्यक असतो. दुर्दैवानेआपल्या संदर्भात ह्यापैकी कुठलीच गोष्ट लागू पडत नाही. अति वयस्क आणि अपंग सभासदांना देखील मतदान करावयाचे असल्यास लांब प्रवास करून अधिवेशन स्थळ गाठावे लागते आणि सदस्य संस्था 10 सभासदांची असो वा 1000 सभासदांची, प्रत्येक संस्थेला समतुल्य मताधिकार आहे दोन दोन मतांचा. असे एक दोन नव्हे तर बरेच मुद्दे आहेत ज्यांच्यावर पुनर्विचार करण्याची फार गरज आहे. अशा सामान्य व्यवहार ज्ञानाच्या चौकटीत न बसणाऱ्या बऱ्याच गोष्टी आहेत म्हणून घटना दुरुस्ती आणि निवडणूक नियमावली ह्याचे कार्य प्राथमिक वरीयतेने कृतीत उतरावे ही इच्छा आहे व तदनुसार पाऊले उचललेली आहेत.

मंडळी मला वाटते कि ह्या पुढे बृहन्महाराष्ट्र मंडळाला पुढे कसे आणायचे आणि पुढे कसे घेऊन जायचे ह्या सबंधी चा माझा दृष्टीकोण मी स्पष्टपणे मांडायचा प्रयत्न केलाय तरी या संदर्भात आपल्या सूचना आणि सुझाव ईमेल, संकेत स्थळ, व्हॉटसप्प च्या माध्यमातून पाठवले जाऊ शकतात ज्याची योग्य ती दाखल घेण्यात येईलच. उपस्थित आवाहन पेलायला थोडं जड असेल पण अशक्य नाही. आपण सर्वांना थोडा चाकोरी बाहेर देखील विचार करावा लागेल. माझा विश्वास आहे कि

क्षितीजापलीकडे पाहण्याची दृष्टी असेल,
तर क्षितीज नक्की गाठता येतं.

आमच्याकार्यकारिणीच्या कारकीर्दीने मंडळाची स्थिती उत्तुन्गते कडे नेली कि आणखी गर्तात ढकलली ह्यावरच आम्ही पुढील निवडणूकीत सभासदांनासमोर जायचंय आहे याची मला जाणीव आहे. तरी आपण सर्वांच्या सहयोगाने आपण आपली लक्ष्यें अवश्य सर करू हा विश्वास आहे .

**धन्यवाद**

**आपलाच**

**मिलिन्द महाजन**
कार्याध्यक्ष

# प्रधान कार्यवाहचे मनोगत

# माझी बृहन्महाराष्ट्र मंडळातील वाटचाल

☐ **दिलीप कुंभोजकर,** प्रधान कार्यवाह

माझे वडील स्व. श्री मनोहर कुंभोजकर, बहीण सौ. अंजली कुंभोजकर, तिवारी हे मंडळाचे सदस्य माझ्या आधी झाले जोधपुर, जमशेदपूर व झांसी ह्या अधिवेशना ला जाऊन आल्यावर त्याचे वर्णन ते करीत त्यामुळे 22/12/1995 रोजी मंडळाची आजीवन सदस्यता घेऊन मी 1995 साली बंगलोर अधिवेशनास प्रथम गेलो व मंडळाच्या कार्यात सक्रिय सहभाग असावा, कार्य करावे असे मला मनापासून वाटले व त्याच मुळे 1996च्या बृहन्महाराष्ट्र मंडळ गांधीनगर येथील अधिवेशनात सहकोषाध्यक्ष पदावर निवडणूक लढवली व जोरदार आपटी खाल्ली. पण मंडळात कार्य करण्याची इच्छा मला पुन्हा प्रयास करण्यास प्रोत्साहित करीत होती. अशा प्रकारे मी मंडळाच्या कार्यात ओढला गेलो व पुढे अविरत विविध पदावर कार्य करण्याची संधी आपण सर्वांनी मला दिलीत त्याबद्दल मी आपल्या सर्वांचा आभारी आहे.

## विभागीय कार्यवाह (महाकौशल) 1998-2000

1998च्या उज्जैन अधिवेशनात विभागीय कार्यवाह (महाकौशल) ह्या पदावर निवडणूक जिंकून कार्यकारिणी मध्ये प्रवेश केला. ह्या दोन वर्षाच्या काळात वर्ष 2000 मध्ये जबलपूर येथे अधिवेशन झाले. त्यात सक्रिय सहभाग होता. ते निवडणुकी चे वर्ष असल्याने मी कार्यवाह पदी निवडून आलो व मला डॉ. मीना ताई पिंपळापुरे ह्यांच्या कुशल नेतृत्वात व मार्गदर्शनात कार्य करण्याची संधी मिळाली, अनुभव मिळाला व मुख्य म्हणजे त्यांनी माझ्या वर विश्वास दाखवून मुक्त पणे कार्य करण्यासाठी सर्व सहकार्य दिले, त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

## कार्यवाह 2000-2002

कार्यवाह पदी असताना मी अखिल भारतीय काव्य स्पर्धा आयोजित करून त्यातील कांही निवडक कवितांचा एक संग्रह 'प्रतिबिंब' ह्या नावाने प्रकाशित केला. 2001 साली चेन्नई येथे झालेल्या अधिवेशनात मा. श्री विलासराव देशमुख व मा. श्री सुशील कुमार जी शिंदे ह्याचा द्वारे काव्य संग्रहाचे विमोचन झाले.

## प्रधान कार्यवाह 2002-2004 2004-2006

वर्ष 2002 मध्ये झालेल्या निवडणुकीत प्रधान कार्यवाह पदी निवडून आलो व सर्व प्रथम 2001 साली सुरु झालेल्या घटना संशोधन समिती च्या कामाला वेग दिला. विशेष सर्व साधारण सभा आयोजित करून संशोधित घटना स्वीकृत करून घेतली व 2003 साली भुवनेश्वर अधिवेशनात घटना संशोधनाला अनुमोदन प्राप्त करवून घेण्यासाठी विशेष सर्व साधारण सभा आयोजित केली व रजिस्ट्रार कडून स्वीकृत घेण्यासाठी प्रस्तुत केली. मंडळाचे वर्तमान कार्य त्याच घटने अनुसार होत आहे. बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अधिवेशन 25 कुटुंबे असलेल्या भुवनेश्वर येथे करण्याचा धाडसी निर्णय माझ्या द्वारे घेण्यात आला व ते अधिवेशन तेथील महाराष्ट्र मंडल व कार्यकारिणी ला आवश्यक ते सर्व सहकार्य आम्ही देऊन सफल केले. ह्या अधिवेशनात 'मुक्त मंच' नावाचा अभिनव कार्यक्रम आयोजित करून प्रतिनिधीच्या कलागुणांना प्रोत्साहन दिले सर्वांनी त्याचे खूप कौतुक केले. भुवनेश्वर अधिवेशनाला आलेल्या सदस्यांना त्याची नक्कीच आठवण असेल ह्याची मला खात्री आहे.

प्रधान कार्यवाह च्या काळात मी व्यक्तिगत सदस्यता व संस्थागत सदस्यता अर्ज विकसित केले, संस्था सदस्यता वृद्धी योजना सुरु केली, सदस्यांना परिचय पत्र देण्याची योजना सुरु केली, शास्त्रीय संगीत स्पर्धा गोवा, अलाहाबाद, राजकोट येथे आयोजित केल्या व शास्त्रीय संगीत स्पर्धे च्या पूर्व विजेत्या स्पर्धकांना मंच मिळवून देण्यासाठी पुणे येथे माननीय स्व. श्री अरुण दाते व माननीय श्री उल्हास दादा पवार ह्यांच्या उपस्थितीत महासंगीत संमेलन फेरी आयोजित केली. प्रांतीय व वार्षिक संमेलनाचे आयोजन देखील विविध ठिकाणी करण्यात आले. कैक वर्षे महाराष्ट्र मंडळ, लखनौ चे अधिवेशना चे भुगतान बाकी होते ते त्यांना देऊन त्यांची नाराजी दूर करण्यात आली. मंडळाला महाराष्ट्र शासनाने भूखंड खरेदी साठी दिलेले अनुदान न वापरल्याने शासन परत मागत होते, पण माननीय श्री सुशील कुमार शिंदे ह्यांच्या कडून

त्या पैशात सदनिका विकत घेण्याची अनुमती घेऊन वर्तमान गली नं. 2 पहाडगंज मधील वास्तू विकत घेण्यात आली. ज्यामुळे मंडळाला कायम स्वरूपी आमदनी सुरु झाली व 80 वर्षाचे स्वत:ची वास्तू असावी हे स्वप्न साकार झाले. मंडळाचा 5 एप्रिल हा वर्धापन दिन साजरा करण्याची कल्पना श्री अनिल ढमढेरे ह्यांनी मांडली व त्याचा स्वीकार करून ती अमलात आणण्याचे कार्य मी तत्परतेने केले, दिनदर्शिका प्रकाशन, मराठी भाषा परीक्षा ह्या कैक योजनांचे सफल आयोजन त्या काळात करण्यात आले. माझ्या ह्या यशस्वी कारकीर्दीच्या शिल्पकार डॉ. मीना ताई पिंपळापुरे ज्यांनी मला सतत प्रोत्साहन दिले हे येथे आवर्जून उल्लेख करणे जरुरी आहे. माझे सहकारी श्री बळवंत गोखले, श्री अरुण तारे, श्री अनिल ढमढेरे श्रीमती सुषमा पेंढारकर, सौ. रत्ना पटवर्धन व तत्कालीन सर्व कार्यकारिणी सदस्यांचा मी आभारी आहे.

2006ला हैदराबाद येथे आयोजित अधिवेशना नंतर पुढील पाच वर्षे 2006-2011 मी कोणत्याही पदावर नव्हतो. पण त्या काळातील जवळ जवळ सर्व अधिवेशनास मी उपस्थित होतो.

## कोषाध्यक्ष 2011-2014 2014-2017

2011 च्या शिर्डी अधिवेशनात कोषाध्यक्ष पदी सर्वात अधिक मताधिक्याने मी निवडून आलो. श्री विलास बुचके कार्याध्यक्ष व प्रधान कार्यवाह श्री शेखर अमीन ह्यांच्या सोबत 2011-2014 कार्य करताना कोषाध्यक्ष पदाचे कार्य तर मी केलेच पण त्या सोबत 'गौरव बृहन्महाराष्ट्रचा' ही अभिनव सुगम संगीताची स्पर्धा आयोजित करण्याची परिकल्पना कार्यकारिणीच्या समोर ठेऊन त्याच्या प्राथमिक फेऱ्या विविध प्रदेशात आयोजित करून प्रथम मुख्य स्पर्धा उज्जैन महाराष्ट्र समाज अंतर्गत आयोजित केली ज्यात नामवंत संगीत गायक पंडित शौनक अभिषेकी हे परीक्षक म्हणून उपस्थित होते. महाराष्ट्र मंडळ उज्जैन चे तत्कालीन सचिव श्री अनिल ढमढेरे ह्यांनी व मी स्पर्धेची संपूर्ण नियमावली तयार करून ही स्पर्धा यशस्वी केली. त्यानंतर वडोदरा, कोटा येथे देखील ह्या स्पर्धा माझ्या संयोजनात आयोजित केल्या गेल्या. हे लिहिताना मला विशेष आनंद होत आहे.

2014 साली पुन्हा भोपाल येथे निर्दलिय उमेदवार म्हणून कोषाध्यक्ष पदी निवडून आलो 2010 ते 2017 ची Balance Sheet, Income & E&penditure A/c वेळेवर अंकेक्षण पूर्ण करून ते आपल्या समोर सादर केले, मंडळाचे प्रत्येक वर्षाचे बजेट बनवणे ते कार्यकारिणी कडून स्वीकृत करून आम सभेकडून स्वीकृत करून घेणे, माय मराठी मध्ये प्रकाशन ही व आपण सोपवलेली सर्व कामे मी वेळशीर पूर्ण केली.

## वर्तमान कार्यकाळ व कार्ययोजना -

जानेवारी 2018 गोवा अधिवेशनात माननीय श्री मिलिंदजी महाजन ह्यांच्या आशीर्वाद पॅनल ने प्रवेश देऊन मला पुनश्च प्रधान कार्यवाह पदी जागा देउन निवडणूक लढवण्याची संधी व संपूर्ण आशीर्वाद पॅनल यशस्वी झाले दिनांक 25/03/2018रोजी आम्ही पदभार ग्रहण करून मंडळाचा वर्धापन दिन 5 एप्रिल महाराष्ट्र मंडळ, हैदराबाद येथील विस्तीर्ण ओपन सभागृहात साजरा केला तेथील साधारण पणे 20 ते 22 संस्थांना मोमेंटो व पुष्प गुच्छ देउन त्या दिवशी सन्मानित करण्यात आले. वातावरण निर्मिती साठी विविध संस्थांचे वर्धापन दिनाच्या शुभेच्छां चे फलक हॉल मध्ये लावण्यात आले होते. महाराष्ट्र मंडळ हैदराबाद व तेथील अनेक संस्थांनी मंडळाच्या कार्यकारिणीचे शाल श्रीफळ देऊन भव्य स्वागत केले. विविध शहरात वर्धापन दिन साजरा करण्यासाठी विभागीय कार्यवाह ना सूचना देण्यात आली होती. त्यानुसार जयपूर, जबलपूर, कोलकत्ता आदी विविध ठिकाणी वर्धापन दिन साजरा झाला त्याची माहिती माय मराठी मध्ये वेगळ्याने दिली आहे.

05 एप्रिल 2018रोजी हैदराबाद येथे कार्यकारिणीची प्रथम बैठक आयोजित करून पुढील योजनांचा आराखडा कार्यकारिणीने बनवला व कांही समितींचे गठन केले व कांही सदस्यांना मनोनीत केले. बऱ्याच वर्षापासून सदस्यांची इच्छा होती की घटना संशोधन करून कांही प्रदेशात अतिरिक्त पदे निर्मित करावी, तसेच अन्य बरीच संशोधने सदस्यांनी सुचवली होती त्या सर्व गोष्टींचा विचार करून 'घटना संशोधन समिती' चे गठन करण्यात आले व श्री यशोवर्धन फाटक इंदूर ह्यांना ह्या समिती चे प्रमुख करण्यात आले. श्री बळवंत गोखले व श्री सूर्यकांत कुळकर्णी हे समितीचे सल्लागार पदी आहेत व श्री विजय पित्रे, श्री शिंदे, श्री प्रमोद चौधरी हे समितीचे सदस्य आहेत. श्री शेखर अमीन हे स्वतंत्र पणे मंडळाच्या निवडणुकी चे मेन्युअल(इलेक्शन मेन्युअल) बनवतील. दोन्ही कामे एका निश्चित कालावधीत पूर्ण करून दोन विशेष सर्व साधारण सभा आयोजित करून घटना संशोधन स्वीकृत करण्याचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले आहे. संशोधित घटना रजिस्ट्रार कडे मंजुरी साठी देण्यात येईल व स्वीकृती नंतर लागू करण्यात येईल. आम्ही पदभार ग्रहण करताना जवळ जवळ 4-5 लाखाचे देणे पूर्व कार्यकारिणीने शिल्लक ठेवले असल्याचे श्री प्रदीप कुळकर्णी उपाध्यक्ष व गोवा अधिवेशन समितीचे प्रभारी ह्यांनी व श्री जी के दातार कोषाध्यक्ष ह्यांनी सभेला सांगितले. श्री दातार ह्यांनी आर्थिक परिस्थिती बघता कांही आयोजने रद्द करावी व कांही तहकूब करावी असा प्रस्ताव कार्यकारिणी समोर ठेवला आहे. प्रधान कार्यवाह दिलीप कुंभोजकर ह्यांनी वर्तमान सर्व सदस्यांकडून कमीत कमी

रु.1 हजार दान राशी घेण्यात यावी असे प्रस्तावित करून ही राशी 'महाकोष निधी' म्हणून गोळा करावी असा प्रस्ताव कार्यकारिणी समोर ठेवला व तो सर्वानुमते मंजूर झाला. त्यासाठी डॉ. जितेंद्र नाईक ह्यांना महाकोष निधी समिती चे प्रमुख म्हणून नेमण्यात करण्यात आले आहे व त्याचे कार्य 5 एप्रिल वर्धापन दिनाच्या सुमुहूर्तावर सुरु करण्याचे निश्चित झाले व कार्यकारिणीच्या बहुसंख्य सदस्यांनी आपला खारीचा वाटा उचलून त्याच दिवशी देणगी जमा केली व पूर्व कार्यकारिणी सदस्यांनी देखील जुनी देनदारी देण्यासाठी सहयोग करावा अशी अपेक्षा कांही कार्यकारिणी सदस्यांनी व्यक्त केली आहे. महाकोष दान दात्यांची नावे वेळोवेळी माय मराठी मध्ये प्रकाशित करण्यात येणार आहे. विभागीय कार्यवाह व अन्य पदाधिकारी आपणास संपर्क करतीलच तरी त्यांना अथवा कोषाध्यक्ष श्री जी के दातार ह्यांना देणगी चा चेक देऊन सहकार्य करावे ही विनंती.

अधिवेशनाचे स्वरूप तसेच प्रांतीय संमेलनाचे स्वरूप बदलून त्यात विविधता आणण्याचा आमचा विचार आहे तो आगामी काळात आपल्या समोर येईलच, विविध संलग्न संस्थांच्या अडचणी सोडवणे, त्यांना आर्थिक मदत मिळवून देणे, महाकोष निधीतून ह्या योजना राबवणे ह्या दीर्घ कालीन योजना हाती घेतल्या आहेत, सदस्यता यादी अद्यतन करणे बृहन महाराष्ट्राचे प्रथम साहित्य संमेलन आयोजित करणे ह्याचा प्रामुख्याने विचार सुरु आहे.

वेब साईट चे स्वरूप बदलून ती अधिक उपयोगी बनवण्याचे कार्य सुरु आहे. 'ऋणानुबंध' ही जीवन साथी किंवा शादी डॉट कॉम सारखी फिचर असलेली वर वधू जाहिरात माध्यम वेब व माय मराठी च्या माध्यमातून सुरु करण्याचा प्रकल्प हाती घेतला आहे, माय मराठी चे नवे सल्लागार मंडळ व संपादक मंडळ यासाठी मान्यवर लोकांची संमती घेतली आहे. सदस्यता आवेदन वेब च्या माध्यमातून ऑन लाईन करण्यात येणार आहे.

कार्यकारिणी ला आपला सहयोग मिळेल ह्याची मला खात्री आहे श्री मिलिंद महाजन ह्यांचे प्रभावी नेतृत्व व सर्व सहकारी श्री प्रदीप कुळकर्णी, श्री जी के दातार, श्री दीपक कर्पे, श्री अशोक कापुरे, डॉ. प्रमोद जोशी, श्री शेखर अमीन, श्री चंद्रशेखर आपटे, श्रीमती अंजली पराडकर व सर्व विभागीय कार्यवाह ह्यांचे सक्रिय योगदान ह्यात राहणार आहे. आमच्या कार्याची प्रसिद्धी माय मराठी च्या माध्यमातून पोहचवण्याचे कार्य श्री अश्विन खरे संपादक माय मराठी नेहमी प्रमाणे करणार आहेतच. सायबर प्रसिद्धी व घटना संशोधन प्रमुख श्री यशोवर्धन फाटक हे वेळोवेळी मंडळाची प्रगती व योजनांची माहिती वेब वर प्रसिद्ध करीत आहेत. महाकोष निधी समिती चे प्रमुख डॉ. जितेंद्र नाईक ह्यांचे सहकार्य देखील महत्वपूर्ण आहे. आपल्या सर्वांचे सहकार्य आम्हांला आहेच व आपण आमच्या वर जो विश्वास दाखवला आहे तसेच कार्य करण्याची संधी दिली आहे. त्याबद्दल कार्यकारिणी तर्फे व माझ्या तर्फे आपले आभार!

## बृहन महाराष्ट्र मंडळ नवी दिल्लीचे

# 68वे अखिल भारतीय अधिवेशन संपन्न

☐ रेखा गणेश दीघे

सोनेरी वाळूचे किनारे, किनाऱ्यावरील सुरुची बने, नारली पोकळीच्या बागा, फेसाळत येणाऱ्या समुद्राच्या पांढऱ्या लाटा, सुर्यास्ताचा डोळ्यात ठेवण्यासारखा नजराणा, आध्यात्मिक विश्वात घेऊन जाणारी मंदिरे, हजारो जातींच्या पशुपक्षांना आश्रय देणारी अभयारण्ये, मसाल्याच्या विषयी अनोखी सैर घडवून आणणारी स्पाईस गार्डन परशुराम ऋषींनी समुद्रामध्ये बाण मारून निर्माण केलेली उत्पत्ती, निसर्गाची देन, आणि कलावंतांची खाण असलेल्या गोव्याच्या रम्य वातावरणात बृहन्महाराष्ट्र मंडळ, नवी दिल्ली या संस्थेचे अखिल भारतीय, 68वे अधिवेशन संपन्न झाले. त्यात संथेच्या द्वैवार्षिक निवडणुकीची भर पडली. पहिल्या दिवशी 26जानेवारी रोजी सभासद दाखल होऊ लागले. विविध ठिकाणी, जागेच्या उपलब्धतेनुसार सभासदांव्याची राहण्याची व्यवस्था करण्यात आली होती. मडगाव स्टेशन पासून सभासदांना आणण्यासाठी बसची व्यवस्था उपलब्ध केली होती. सभासद नोंदणी केल्यानंतर सायंकाळी बृ. महाराष्ट्रातील संगीत स्पर्धेतील यशस्वी कलाकारांचा कार्यक्रम गौरव महाराष्ट्राचा रामनाथी देवस्थानच्या सभागृहात आयोजित केला होता. त्यानंतर वास्तव्यातून घडलेले विनोद' या विषयी कथाकथनाचा कार्यक्रम बेळगावचे अनिल चौधरी यांनी सादर केला. महाराष्ट्र मंडळ अहमदाबाद यांनी लघुनाट्य सादर केले. दुसऱ्या दिवशी क्रांती मैदान' फोंडा येथून दादा

विध चौकातून राजीव गांधी कलामंदिर पर्यंत भव्य शोभा यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. यात मोऱ्या झांज पथक, बेळगाव शिमगोत्सव रंगमंच, वेलीग मित्रमंडळ शिरोडा, घोडे मोडणी, कमलावती, रवळनाथ कलामंच करमली यांचा प्रामुख्याने सहभाग होता. त्याच बरोबर पारंपारिक वेशभूषेतील स्त्री पुरुष. मिरवणूक विसर्जित झाल्यानंतर राजीव कलामंदिर येथे वार्षिक सर्व साधारण सभेस सुरुवात झाली. सर्व बाजूंनी उपस्थित सभासदांनी श्री रवी गिऱ्हे यांच्यावर प्रश्नांचा भडीमार केला. परंतु निरुत्तर झालेल्या गिऱ्हे यांनी सभासदांच्या प्रश्नांना न पटणारी उत्तरे देऊन वेळ मारून नेली. सभा पार पडणे गरजेचे (ही नाराजी रद्द झालेल्या निवडणूक निकालावरून स्पष्टपणे दिसून आली.) दुपारी मध्यवर्ती संथा व बृहमहाराष्ट्र मंडळ गोवा आयोजन समितीतर्फे आयोजित अधिवेशनाला सुरुवात झाली. यांना मराठी भाषा प्रेमी मंडळ बेळगाव आणि कला व सांस्कृतिक संचालय गोवा सरकार यांचे विशेष सहकार्य लाभले. दिवाकर सिंकरे यांच्या स्वागतपर भाषणानंतर मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलनकरून उद्घाटन केले. कार्याध्यक्ष बुचके यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. गोवा येथे अधिवेशन असल्यामुळे सभासदांची उपस्थिती अधिक असल्याचे सांगत, ते म्हणाले सर्वांना पर्रीकरंचे भाषण ऐकण्याची उत्सुकता आहे. परंतु कांही अपरिहार्य करणामुळे पर्रीकर उपस्थित राहू शकले नाहीत. या वेळी अभिनते पुष्कर श्रोत्री याचं आगमन झाले. त्यांचे स्वागत व सन्मान आयोजकांच्या हस्ते करण्यात आला. गेल्या पांच वर्षात बृहनमहाराष्ट्र मंडळाने केलेल्या कार्याचा आढवा श्री रवी गिऱ्हे यांनी घेतला. पर्रीकर यांनी राजीव गांधी कलामंदिर नि:शुल्क उपलब्ध करून दिल्याचे त्यांनी सांगितले. 'सुरक्षितता' 'आपुलकी' आणि माणुसकी यांचा संगम म्हणजे मराठीपण होय असे स्पष्ट करीत विलास अध्यापक यांनी संपादित केलेल्या 'चांदणवेल' या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी संस्थेतर्फे देण्यात येणाऱ्या विविध विशेष पुरस्कारांचे वितरणही करण्यात आले.

**1. गोमान्तक गौरव पुरस्कार** – 1.गोपाळराव मयेकर. 2. माधव श्रीनिवास कामत. 3. प्रसादजी सावरकर. 4. ब्राम्हनंद सगुन कामत शंखवालकर

**बृहन्महाराष्ट्र मंडळ नवी दिल्लीचे 68वे तीन दिवसीय अधिवेशन पोंडा गोवा येथे दि. 26, 27 व 28जानेवारी 2018रोजी आयोजित केले गेले. याप्रसंगी बृहन्महाराष्ट्रातील विभिन्न प्रतिष्ठित सन्माननीय मराठी प्रतिभांचा सन्मान श्री.पुष्कर श्रोत्री यांचे हस्ते केला गेला. ज्यात डॉ. कर्नल प्रकाश चितळकर इंदूर (प्रसिध्द कॅन्सर स्पेशालिस्ट), प्रो.डॉ. सुरेश देशपांडे, बेंगलोर (प्रसिध्द वैज्ञानिक), डॉ.सौ. पुष्पा द्रविड बेंगलोर (प्रसिध्द आर्टिस्ट व श्री. राहुल द्रविड यांच्या मातोश्री), डॉ. प्रसन्ना कुलकर्णी देवास (प्रसिध्द चिकित्सक), श्री.विजय कृष्ण भागवत लखनऊ (प्रसिध्द प्रशासकीय अधिकारी), डॉ. रविंद्र रेखडे - कोलकाता, डॉ. श्रीकांत तारे इंदूर, डॉ. रविद्र अभ्यंकर होशंगाबाद, सौ. प्रियंका भागवत भोपाळ (टीव्ही सिरियलच्या निर्मात्या), श्री.जगदीश कुंटे बेळगांव (प्रसिध्द कार्टुनिस्ट), श्री.आनंद मंडसे बेळगांव व्याख्याता, श्री.भाऊराजे जहांगिरदार हैद्राबाद, श्री.वसंत पुराणीक खंडवा, श्री.संजय जोशी भोपाळ, श्री.मदन पवार शिंपी बडोदा व संस्थांचा सत्कार केला गेला.**

**2. जीवन गौरव पुरस्कार** – 1. डॉ. कर्नल चितळकर इंदूर 2. प्रो. डॉ. सुरेश देशपांडे बेंगळूर. 3. डॉ. श्रीमती पुष्प द्रविड बेंगळूर. 4. डॉ. प्रसन्ना कुळकर्णी. देवास 5. विजय भागवत लखनौ. 6. डॉ. रविंद्र रेखडे कोलकाता. 7. डॉ. श्रीकांत तारे इंदूर. 8. प्रा. डॉ. रवींद्र कुमार अभ्यंकर होरांगाबाद. 9. कु. हर्षिता जोशी. 10. सु. श्री. प्रियांका पुराणिक भोपाळ. 11. जगदीश कुंटे बेळगाव 12. आनंद मेणसे बेळगाव.

**3. बृहन्महाराष्ट्र गौरव संन्मान** – 1. भाऊराव जहागीरदार हैदराबाद. 2. वसंतराव पुराणिक खांडवा. 3. शुभांगी आपटे रायपुर. 4. संजय जोशी भोपाळ 5. मदन पवार बडोदा

संस्थांचा सन्मान – 1. महाराष्ट्र मंडळ पोर्टब्लेअर 2. गोमंतक विद्या निकेतन मडगाव. 3. महाराष्ट्र मंडळ बेंगळूर. 4. महाराष्ट्र समाज अहमदाबाद. 5. संत गजानन महाराज देवस्थान रायपुर. 6. कुलस्वामिनी शिरकादेवी सेवा मंडळ बडोदे. 7. बालिका आदर्श विद्यालय, टिळकवाडी बेळगाव 8. स्वर संवाद सांस्कृतिक एवं साहित्यिक संस्था उज्जैन या शिवाय 10 वी 12 वी परितोषिक गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी – 1. स्वरदा जूळकर 10 वी परीक्षा इंदूर 2. निधी तारे 12 वी परीक्षा रतलाम 3. अदिती ऊर्ध्वरेषे 12 वी परीक्षा खांडवा. उद्घाटन कार्यक्रमानंतर पुष्कर श्रोत्री यांचा विनोदी बहुरूपी नाट्यखेळ हसवा फसवी हा सादर करण्यात आला. तिसऱ्या दिवशी रामनाथ देवस्थान येथे संस्थेच्या निवडणूक मतदान प्रक्रियेला सुरुवात झाली. निवडणुकीचे निकाल सायंकाळी उशिरा हाती आले. अत्यंत चुरशीची अशी निवडणूक पार पडल्यानंतर लोकांनी बुचके यांच्या मनमनी कारभारला चोख उत्तर देऊन श्री. मिलिंद महाजन यांचा आशीर्वाद समूहला आपली पसंती देऊन त्यांना प्रचंड बहुमताने विजयी केले. यानंतर कोणताही समारोपचा कार्यक्रम सादर केला नाही. ही अत्यंत खेदाची बाब आहे. पुढील दोन वर्षासाठी खालील सदस्यनिवडून आले. कार्याध्यक्ष – श्री. मिलिंद महाजन इंदूर. उपाध्यक्ष –श्री. प्रदीप कुळकर्णी बेळगावप्रधान कार्यवाह–श्री दिलीप कुंभोजकर जबलपूर. कार्यवाह –श्री. दीपक कर्पे देवासकोषाध्यक्ष, श्री. दातार जी के. हैदराबाद. सह कोषाध्यक्ष – श्री. अशोक कापूरे अहमदाबाद.

## महिला प्रकोष्ट चा कार्यक्रम झाला

**गोवा येथे झालेल्या अधिवेशनात दिनांक 28-1-18रोजी दुपारी 3 वाजतां महिला प्रकोष्ठ चा कार्यक्रम झाला.ह्या कार्यक्रमात मुख्य अतिथी नरसिंगड च्या डॉ .स्वाती चांदोरकर होत्या.सर्व प्रथम महिला प्रकोष्ठ प्रमुख श्रीमति नीला करंबेळकर यानी महिला प्रकोष्ठ संबंधी व कार्यक्रमा संबंधी सविस्तर माहिती दिली विभिन्न क्षेत्रांत मोठी विशिष्ट कामगिरी करणाऱ्या पांच महिलांचा सम्मान करण्यांत आला.व नंतर मनोरंजनात्मक कार्यक्रमा नंतर डॉ स्वाती चांदोरकर यांचे ओजस्वी भाषण झाले. महिलांना मंडळात प्राधान्य मिळवून देण्यावर त्यांनी आपले विचार सविस्तर मांडले. नंतर माजी प्रधान कार्यवाहयांनी आपल्या भाषणांत आपले विचार मांडून महिलांच्या कार्यक्रमा साठी ? 25000/- मान्य केल्याचे सांगितले शेवटी आभार प्रदर्शना नंतर समापन झाल्याची घोषणा केली.**

**– श्रीमती नीला करंबेळकर**

**सौ. श्री महाजन** – श्रुति महाजन सध्या आपल्या पति बरोबर हैद्राबादला निवास करीत आहेत. लहान पणा पासून चित्रकारी मध्ये आवड होती. भोपाळ येथे स्व. श्री लक्ष्मण भांड ह्यांच्या कडे ड्राइंग चे प्राथमिक शिक्षण घेऊन, बडोदा येथे एमएस युनिव्हर्सिटीत स्नातक झाल्यावर, अहमदाबाद एनआईडी मधून पोस्ट ग्रेजुएट झाल्यावर, 'झिनी-बिनी' नावाचा प्रकल्प महेश्वर ला रेहाना सोसायटी बरोबर केला. मुंबईच्या कुलाबा उपनगरांत 'किमोल्ड प्रेस कॉटरोड' ह्या चित्रकलेच्या दालनात पहिली चित्र प्रदर्शनी लावली. विशेष म्हणजे जर्मनीच्या कलाकारांनी खूप स्तुती केली व परिणामी जर्मनी च्या कोलोन शहरांत 'आर्ट्स रेसीडेंसी' कार्यक्रमांतर्गत रहाण्या करिता, 6महिन्या करिता आमंत्रित केले. तिथल्या प्रसिद्ध चित्रकार कु. अल्केरी यांच्या बरोबर चित्र प्रदर्शनाची संधी मिळाली. अलीकडेच लेखिका अनिता देसाई, लेखक सुखवंत सिंह व प्रेमचंद्र ह्यांच्या पुस्तकांचे कव्हर पेज करण्याची संधी ह्यांना मिळाली. जर्मनीच्या 'हेंबर्ग' नावांच्या शहरांत 'भारतीय आठवडा' म्हणून साजरा केल्या जाणाऱ्या कार्यक्रमांत ह्या विषयांवर वक्तव्य देण्याची संधी त्यांना मिळाली. राष्ट्रीय डिजाईनिंग संस्थानमध्ये विजिटिंग फेकल्टी च्या रूपांत काम करत आहेत. त्यांची चित्रे डॉलर्स मध्ये विकली जातात.

**सौ. कल्पना केकरे** – सौ. कल्पना केकरे ह्या ----ह्या गृह उद्यमी महिला आहेत. ह्यांनी माननीय प्रधानमंत्री श्री नरेन्द्र मोदींनी सुरू केलेल्या स्वच्छ भारत अभियानाच्या अंतर्गत स्वच्छ भोपाळचा पाया घातला. 'आय क्लीन' लोकांची एक सामाजिक संस्था स्थापन केली. ही प्रथम केवळ सहा सदस्यांनी मिळून सुरू केली. थंडी, वारा, ऊन पावसाची तमा न बाळगता अविरत काम सुरू केले. आज ह्यांच्या टीम मधे डॉक्टर्स, इंजिनियर्स, प्रोफेसर्स, लॉयर्स आणि शाळा कॉलेज चे विद्यार्थी पण आवडीने कामे करीत आहेत. वर्गणी करून लागणारा खर्च भागवतात. कल्पना ताईंच्या नेतृत्वा खाली जवळ जवळ 200 लोक समर्पित होऊन कामें करीत आहेत. भोपाळ शहरांत जागोजागी स्वच्छता करून त्या जागे वर पेंटींग करून ती जागा सुशोभित केली आहे. म.प्र. च्या मुख्य मंत्र्यांच्या हस्ते ह्यांच्या संपूर्ण टीमचा सत्कार झाला. 2016मध्ये ह्यांना स्वच्छ भोपाळचे ब्रांड एम्बेसेडर चा खिताब मिळाला. 2015 मधे 'मिलिट्री ऑफ उपवन डेवलपमेंट' तर्फे दिल्लीला इंडिया गेट वर सत्कार केला गेला. शिवाय 2000 पासून ह्या केटरिंगचे काम करीत आहेत. गरीब अनाथ मुलांची मदत करणे, वृद्धाश्रमात जाऊन त्यांना मदत करून त्यांचे मनोरंजन करणे, अशिक्षित स्त्रियांना शिक्षित करणे इत्यादी सामाजिक कार्य देखील त्यांचे उपक्रम आहेत.

**कु. नतिक्षा मराठे** – वयाच्या अवघ्या 12व्या वर्षी ज्युनियर नेशनल च्या मि. स्प्रींग मधे पोहण्याचा पराक्रम गाजवून स्वर्ण पदक पटकावले. अशा प्रकारे आयुष्यातला पहिला यशाचा झेंडा फडकावला. 2015 मधे नेशनल गेम्स मधे प्रवेश मिळवून राजकोट येथे स्कूल नेशनल मधे 3 मि. स्प्रींग बोर्डात पण स्वर्ण पदक मिळवले. त्यानंतर मागे वळून पहाता. ज्युनियर नेशनल पुणे 3 मि. स्प्रींग चे स्वर्ण व 1 मि. स्प्रींगचे रजत पदक. कोलकत्ता स्कूल नेशनल स्वर्ण व रजत पदक. नंतर अंतर राष्ट्रीय स्कूल पेसेफिक मधे निवड होऊन ऑस्ट्रेलिया मध्ये भारताचे प्रतिनिधित्व करून मोठी मजल गाठली. 2016मधे श्रीलंका येथे साऊथ एशियन एक्टेटिक चैम्पियनशिप मधे डाईविंगच्या दोन्ही स्पर्धा स्वर्ण पदक घेऊन जिंकल्या. 2017 मधे पुन्हा पुणे ज्युनियर नेशनल ला कांस्य व स्वर्ण पदक पटकावले. सिनियर नेशनल इंदौर येथे कांस्य व रजत. स्कूल नेशनल दिल्ली ला स्वर्ण पदक, अंतर राष्ट्रीय स्कूल पेसिफिक गेम्स एडिलेट, ऑस्ट्रेलियाला धडक दिली. अलीकडे मध्यप्रदेश खेल प्रशासना तर्फे 'एकलव्य' पुरस्काराने सम्मानीत केले गेले.

**सौ. राजश्री खांडेपारकर** – सौ. राजश्री खांडेपारकर ह्या मुळच्या (गोवा) पणजिम च्या. एम.ए. (पब्लिक एडमिनिस्ट्रेशन) आणि पीजीडी (पब्लिक रिलेशन) पहिली. सौ. गोमांतक 2006मधली, जीवन सहचर च्या योग्य साथीने श्री व सौ. सारस्वत 2014 मध्ये घोषित किताब प्राप्त, नागपूर येथे उत्कृष्ट एनएसएस स्वयंसेवक ही बक्षिसे प्राप्त. 1990 साली गणतंत्र दिवस परेड साठी नागपूर विश्व विद्यालय तर्फे प्रतिनिधित्व केले. औद्योगिक वृत्त पत्रे, आकाशवाणी, दूरदर्शन साठी लेखन, अभिवाचन, काव्य लेखन, निवेदन हे आवडते प्रांत. पाककले साठी देखील अनेक बक्षिसे पटकावली. गोव्याच्या महामहीम राज्यपाल मृदुला सिन्हा ह्या नामवंत लेखिकेच्या परितृप्त लंकेश्वरी ह्या पुस्तकाचा मराठी सशक्त अनुवाद ह्यांनी अलीकडे केला आहे.

**सौ. उषा दातार** – उषाताई दातार ह्या कर्नाटकातील आरासी केयर येथील सुप्रसिद्ध नर्तकी आहेत. त्या 'भरतनाट्यम, कुचिपुडी, मोहिनी अट्टम, कथ्थकलीच्या सात्विक अभिनेत्री व देवळातील नर्तकी आहेत.' भरत नाट्यम चे शिक्षण त्यांनी त्यांच्या मातुश्री कडून, कुचिपुडी नृत्य व सात्विक अभिनयाचे शिक्षण डॉ. नटराजा रामकृष्ण यांचे कडून, व्यवसायी नृत्य कला 'आंध्र स्कूल ऑफ अभिनय मधून, मोहिनी अट्टम श्री पद्मश्री चन्निामु अमु यांचे कडून मिळवले. कथ्थकली चे शिक्षण डॉ. व्यंकट लक्ष्मण व पुथाना मोक्षम ऑफ कथ्थकली स्टाईल येथून घेतले. विविध नृत्य शैली मध्ये उषाताई अद्‌भुत नृत्यांगना आहेत. त्यांचा बराच शिष्यवर्ग पौर्वात्य देशांत पसरलेला आहे. बेंगलोर मधे त्यांची 'दातार फाईन आर्टस' ही नृत्य प्रशिक्षण संस्था आहे. त्यांच्या ह्या कार्याकरता त्यांना खूप खूप शुभेच्छा.

# अधिवेशना संबंधी छायाचित्रे

# घटना संशोधन प्रक्रियेत सहभागी होण्या संबंधी निवेदन

**आदरणीय सभासद हो, स.न.वि.वि.,** जानेवारी 2018मध्ये गोवा येथे संपन्न 68व्या अधिवेशन समयी आणि तसेच अधिवेशन पश्चात आपणा पैकी बऱ्याच सभासदांनी विशेषकर काही वरिष्ठ सदस्यांनी आणि माजी पदाधिकाऱ्यांनी नवीन कार्यकारिणी सदस्यां समक्ष निवेदन केले होते कि बृहन्महाराष्ट्र मंडळाचे बरेचसे व्यवहार आपल्या मूळ घटने मागील विचारांच्या अनुरूप होत नाही कारण कि दैनंदिन तसेच निवडणूक इत्यादी सारखे विशेष व्यवहारात देखील असे निर्णय आढळून येतात ज्या संबंधी लागू घटनेत स्पष्ट नियम/पोटनियम उपलब्ध नसल्या कारणाने सोयीस्कर व्याख्या करण्यात येते. कुठल्याही संघटनेचा विकास किती प्रमाणात आणि किती लवकर होतो ह्या मागे जेवढी महत्वपूर्ण नेतृत्व ईच्छा असते किंबहुना तेवढंच महत्व संस्थेच्या घटनेची व्यापकता, लवचिकता आणि समावेशकता ह्याला देखील असतं. काळानुरूप बदल हे संस्थेच्या घटनेत व्हायलाच पाहिजेत. तेव्हांच कुठलीही संस्था आपल्या उद्दिष्टांची पूर्ती करू शकते. बृहन्महाराष्ट्र मंडळ नवी दिल्ली ह्या आपल्या संस्थेने देखील वेळोवेळी ह्या आवश्यक्तेचं संज्ञान घेऊन पूर्वी सुद्धा घटनेत सुधार केले आहेत. देशातील भौगोलिक बदल, विभागवार सभासदांच्या संख्येतील असंतुलन, सभासदांचा आग्रह आणि काळानुरूप गरज ह्याची दखल घेऊन नवीन कार्यकारिणी ने 5 एप्रिल 2018रोजी हैदराबाद येथे झालेल्या प्रभार हस्तांतरणोपरांत प्रथम बैठकीतच 'घटना संशोधन' करण्यास घटना दुरुस्ती समिती नेमली जी सर्व घटकांचा ह्या संबंधीचा अभिप्राय जाणून घेवून तसेच नवीन कायदे आणि तंत्रज्ञानात झालेला विकास लक्षात घेवून आवश्यक असलेले संशोधन संबंधी आपला अहवाल कार्यकारीणीस पुढील कारवाई करिता प्रस्तुत करेल. ह्या घटना संशोधन प्रक्रिये अंतर्गत निवडणूक प्रक्रिया देखील स्पष्ट व्हावी आणि त्या संबंधीच्या नियमांत सुसंगतता साधावी असाही मानस आहे. तरी आपण सर्व सन्माननीय सदस्यांना विनम्र विनंती आहे कि आपण सर्वांनी आपापल्या सूचना आणि सुधार प्रस्ताव खालील माध्यमातून अवश्य प्रेषित कराव्या. व्हाटसप 8989792200 ईमेल. ghatana@bmmindia.org.in संकेतस्थळ www.bmmindia.org / www.bmmindia.in/ www.bmmindia.org.in येथे 'सभासद संवाद' ह्या विकल्पा द्वारे सुद्धा आपले मनोगत पाठवू शकता. ही प्रक्रिया प्रारंभ झाली आहे आणि आपण ह्या संदर्भात दिनांक ३१ ऑगस्ट 2018 पर्यंत संपर्क करू शकता. धन्यवाद

**यशोवर्धन फाटक, समन्वयक आणि प्रभारी घटना संशोधन समिती**

## साहित्य महामंळ करणार बृहन्महाराष्ट्रातील मराठीचा अभ्यास

सर्व राज्यांतील अभ्यासाचा अहवाल समिति १५ डिसेंबर २०१८ पर्यंत महामंडळाला सादर करणार आहे. बृहन्महाराष्ट्राला सादर करणार आहे. बृहन्महाराष्ट्राच्या भाषिक धोरणाबाबत कृतीरूप पाऊल उचलण्यासाठी महामंडळाच्या वतीने हा अहवाल राज्यशासनाला सादर करण्यात येणार असल्याची माहिती अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाद जोशी यांनी दैनिक पुढारीला दिली. महाराष्ट्राशिवाय देशाच्या अन्य राज्यात मराठी भाषिक मोठ्या प्रमाणावर वास्तव्यास आहे. या राज्यातील मराठी भाषेच्या सद्यस्थितीचा अभ्यास करण्याचा निर्णय अखिल भारतीय साहित्य महामंडळाने घेतला असून या अभ्यासाठी महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांची समितीही नियुक्त करण्यात आली आहे. ही समिती बृहन्महाराष्ट्रातील मराठी भाषा, संस्कृती, साहित्य संस्कृतीचा अभ्यास करून त्याबाबत पुढील कृती करण्यासाठी शासनाला अहवाल सादर करणार आहे. पश्चिम बंगाल, तामिळनाडू, मध्यप्रदेश, छत्तीसगढ, गुजरात, गोवा, दिल्ली आणि उत्तर प्रदेश या राज्यांमधील मराठी भाषा, साहित्य, संस्कृतीच्या जीवनाच्या विविध क्षेत्रातील सध्याची स्थिती काय आहे, हे जाणून घेण्याचा निर्णय अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाने घेतला आहे. महामंडळाने घेतलेल्या निर्णयाबाबत कृती करण्यासाठी समिती नियुक्त करण्यात आली. महामंडळाच्या नागपूर येथे झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. महामंडळाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाद जोशी यांच्या अध्यक्षतेखाली या समितीची नियुक्त करण्यात आली आहे. या समितीच्या सदस्या डॉ. अनुपमा उजगरे, प्रा. मिलिंद जोशी हे पश्चिम बंगाल, तामिळनाडू, मध्यप्रदेश व छत्तीसगढ़ या राज्यात, डॉ. विलास देशपांडे आणि इंद्रजीत ओरके हे गुजरात व गोवा, तर प्रा. कौतिकराव ठाले पाटील आणि महामंडळाच्या उपाध्यक्षा डॉ. विद्या देवधर या तेलंगणा आणि कर्नाटक राज्यात दौरे करणार आहे. हे सदस्य दौऱ्या दरम्यान मराठी भाषा, साहित्य, संस्कृती टिकवून धरणारे विविध समुदाय, संप्रदाय, जाती-उपजाती, पोटजाती यांच्याशी संपर्क साधणार आहेत. या अभ्यास दौऱ्यादरम्यान प्रश्नावली, प्रत्यक्ष मुलाखती, विविध क्षेत्रातील संबंधितांशी चर्चा, गटचर्चा, संबंधित दस्तऐवजांचे एकत्रीकरण समिती करणार आहे.

# बृहन् महाराष्ट्र मंडळ, नवी दिल्ली

## महाकोष संकलन योजना

महाकोष योजना ही मंडळासाठी महत्वाकांशी कार्ययोजना आहे व ह्या महाकोषा ची निर्मिती सर्व घटकांच्या मदती शिवाय पूर्ण किंवा यशस्वी होणार नाही महाकोष निधी समिती ची स्थापनेचा निर्णय हैदराबाद येथे झालेल्या दिनांक 5 एप्रिल च्या बैठकीत सर्वानुमते घेण्यात आला समिती प्रमुख म्हणून डॉ जितेंद्र नाईक हैदराबाद ह्यांची नियुक्ती करण्यात आली त्याचा सोबत अन्य सदस्यांची नावे सक्रीय मदत करणाऱ्या सदस्यातून नंतर विचारात घेऊन निश्चित केली जातील असे ठरले. महाकोषचे व्यवस्थापन/नियोजन /निधी चा वापर ह्या संबंधी चा एक प्राथमिक आराखडा कार्यकारिणी समोर प्रधान कार्यवाह नी ठेवला त्याला सर्वानुमते स्वीकृती देण्यात आली ही योजना वर्धापन दिन रोजी कार्याध्यक्ष श्री मिलिंद महाजन ह्यांनी रु 21 हजार दान राशी घोषित करून केलेली आहे तसेच विविध कार्यकारिणी सदस्यांनी देखील आपली दान राशी घोषित केली त्यांची नावे वेळोवेळी माय मराठी मध्ये प्रकाशित केली जातील

योजने संबंधी प्राथमिक माहिती खालील प्रमाणे आहे ज्यावर आवश्यकते अनुसार व आपल्या सजेशन अनुसार बदल करण्यात येईल.

- निधी चे संकलन विभागीय कार्यवाह व त्यांचा टीम द्वारे केले जाईल वर्तमान सर्व सदस्यां कडून कमीत कमी रु 1000/- 5000/-2000/-( आजीवन/संरक्षक /संस्थागत) दान राशी प्राप्त करण्याची अपेक्षा राहील.
- प्राप्त निधी साठी मान्यवर लोकांचे एक विश्वस्त मंडळ स्थापित करण्यात येईल ज्यांची संख्या 5 राहील व कार्यकाळ 3/4/5 वर्षे ठेवण्यात येईल व राज्य सभे अनुसार नवीन नेमणूक केली जाईल अथवा पुन: नियुक्ती केली जाईल.
- प्राप्त निधी चे अन्य व्यवस्थापन कार्याध्यक्ष/प्रधान कार्यवाह/कोषाध्यक्ष ह्यांचा कडून घटने अनुसार केला जाईल पण त्या साठी विश्वस्त मंडळाची स्वीकृती अनिवार्य करण्यात यावी असे प्रस्तावित आहे.
- ज्या विभागा कडून एका वर्षात सर्वात अधिक राशी जमा केली जाईल त्या टीम ला वर्षाच्या आकडेवारी अनुसार अधिवेशनात सम्मानित केले जाईल.
- शक्यतो सर्व दान राशी चेक द्वारे प्राप्त करण्यात यावी ( चेक बृहन महाराष्ट्र मंडळ नावे दिल्ली च्या नवे घेण्यात यावे व खाते क्रमांक 60091302587 बँक ऑफ महाराष्ट्र करोल बाग शाखा ,नई दिल्ली IFSCODE MAHB 0000140 मध्ये जमा करण्यात यावे)
- कोषाध्यक्ष श्री दातार प्राप्त राशी चे वेगळे रजिस्टर बनवून त्यात विभागवार तसेच सदस्याचे नाव सदस्यता क्रमांक इत्यादी ची नोंद करून एक महाकोष लेजर हेड सुरु करतील म्हणजे प्राप्त निधी ची रक्कम वेगळी दिसेल.
- (अ) रु 1000/- व त्या वर रक्कम देणाऱ्यांची यादी माय मराठी मध्ये वेळोवेळी प्रकाशित केली जावी ।
- (ब) रु 1 लक्ष व अधिक देणाऱ्यांची नावे भवनात बोर्ड वर लावण्यात यावी ।
- (स) रु 10 लक्ष व अधिक देणाऱ्यांचे नाव भवनातील एकाद्या कक्षास अथवा भवनास देण्यात यावे । असे प्रस्तावित आहे

आवश्यकते अनुसार ह्यात बदल करण्यात येईल.

- आर्थिक मदती ऐवजी कोणी आपले घर /जमीन (महाराष्ट्रात/बृहन महाराष्ट्रात) देणगी दिल्यास ते देखील स्वीकार्य राहील.
- सर्व केटेगरी च्या वर्तमान सदस्यांना सदस्यता राशी एवढी रक्कम महा कोष साठी देणे स्वैच्छिक राहील .पण घटना संशोधन मध्ये व्यक्तिगत व संस्थागत सदस्यता शुल्क वाढवण्याचा प्रस्ताव असल्याने घटना संशोधन होईपर्यंत नवीन होणाऱ्या सदस्यांकडून सदस्यता राशी व महाकोष देणगी असे दोन पावती द्वारे जमा अपेक्षित राहील.

**दान राशी महाकोष विनियोग :**

1. संलग्न संस्थांना प्रतिवर्षी त्यांचा आवेदनावर विश्वस्त मंडळ व कार्यकारिणीने निर्णय घेऊन अनुदान स्वीकृती तसेच कलाकार प्रोत्साहन व संस्था सहायता योजना साठी राशी उपलब्ध करण्यात येईल .
2. कोणत्याही परिस्तिथीत महाकोष राशी मंडळाच्या दैनंदिन खर्चासाठी वापरता येणार नाही आवश्यकता असल्यास मंडळाची कार्यकारिणी लोन स्वरूप ही राशी वापरेल त्या साठी कार्यकारिणी ची स्वीकृती आवश्यक राहील.

**दान राशी देणाऱ्या व्यक्ती ला सवलत -**

1.. दिल्ली येथील सदनिकेत मध्ये वर्तमान 25 टक्के सूट व्यतिरिक्त अतिरिक्त सूट वर्षातून 2 वेळा एका वेळी तीन दिवसा साठी देण्यात यावी ( प्रस्तावित )
2. मंडळाने 80जी ची सूट मिळू शकेल ह्या साठी चे प्रयत्न त्वरीत हाती घेतले आहेत व ही सवलत मिळणे सुरु होईल.

अन्य सवलती सदस्यांचा प्रतिसाद व दान राशी ची रक्कम ह्या अनुसार वेळोवेळी होणार्या कार्यकारिणी बैठकीत घेतला जाईल .

वर्तमान 5 हजार सदस्यां पैकी जेवढ्या अधिक सदस्या पर्यंत आपण पोहचू तेवढी ह्याची व्याप्ती वाढेल तरी आपण सर्वांनी सक्रीय होऊन योजना सफल करावी व आपले विचार देउन योजना आणखी आकर्षक कशी करता येईल ते कळवावे ही आग्रहची विनंती.

आपला

**दिलीप कुंभोजकर**

| क्र. | देणगीदाराचे नाव | शहर | रक्कम |
|---|---|---|---|
| 1. | मिलिंद महाजन | इंदूर | 21000/- |
| 2. | यशोवर्धन फाटक | इंदूर | 11000/- |
| 3. | दिलीप कुंभोजकर | जबलपूर | 2000/- |
| 4. | सौ मृणालिनी कुंभोजकर | जबलपूर | 1000/- |
| 5. | कु. तन्वी कुंभोजकर | जबलपूर | 1000/- |
| 6. | देवव्रत कुंभोजकर | जबलपूर | 1000/- |
| 7. | शशिकांत कवीश्वर | देवास | 1000/- |
| 8. | सौ प्रभावती कवीश्वर | देवास | 1000/- |
| 9. | जी के दातार | हैदराबाद | 2000/- |
| 10. | नितीन कपिलेश्वर | बेळगाव | 2000/- |
| 11. | विनीत देव | सागर | 1000/- |
| 12. | प्रभाकर कोरडे | हैदराबाद | 1000/- |
| 13. | डॉ. प्रमोद जोशी | कानपूर | 1000/- |
| 14. | शैलेश लिमये | चेन्नई | 5000/- |
| 15. | डॉ. जिनेंद्र श्रीनिवास नाईक | हैदराबाद | 5000/- |
| 16. | विरेंद्र श्रीनिवास नाईक | हैदराबाद | 1000/- |
| 17. | श्री अभिजित दत्त | हैदराबाद | 1000/- |
| 18. | अनिल राजेश्वरकर | हैदराबाद | 1000/- |
| 19. | मनोहरराव पाटिल | हैदराबाद | 1000/- |
| 20. | अैड. विजय मस्की | हैदराबाद | 3000/- |
| 21. | सर्वोत्तम जोशी | हैदराबाद | 2000/- |
| 22. | मदन क्षिरसागर | हैदराबाद | 1000/- |
| 23. | सत्येंद्र श्रीनिवास नाईक | हैदराबाद | 1000/- |
| 24. | बसुले ॲडव्होकेट | हैदराबाद | 1000/- |
| 25. | ॲड. केशवराव हुलसुरकर | हैदराबाद | 5000/- |
| 26. | जयप्रकाश येवलकर | हैदराबाद | 2000/- |
| 27. | जगन्नाथराव कुलकर्णी | हैदराबाद | 1000/- |
| 28. | मोरेश्वर परलीकर | हैदराबाद | 1000/- |
| 29. | डॉ. प्रमोद शिंदे | हैदराबाद | 5000/- |
| 30. | दिलीप कुलकर्णी | हैदराबाद | 1000/- |

## बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या वर्धापन दिनी नवनिर्वाचित कार्यकारिणीचा हैदराबाद येथे सत्कार

**हैदराबाद.** दिनांक. ०५/०४/२०१८ रोजी महाराष्ट्र मंडळ, हैदराबाद येथे नव निर्वाचित बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या संपूर्ण कार्यकारिणीचा सत्कार कार्यक्रम आयोजित करण्यात आला बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या आजपर्यंतच्या इतिहासात असा योग कधीच आला नव्हता, एक तर सर्व मराठी संस्थेतर्फे संपूर्ण कार्यकरिणीचा सत्कार, व बृ.म.म.चा वर्धापन दिन साजरा व संपूर्ण कार्यकारिणीची उपस्थिती. हैदराबाद येथे महाराष्ट्र मंडळाची विशेष सजावट करण्यात आली होती व संपूर्ण कार्यकारिणीस व्यास पीठावर बसविण्याची व्यवस्था करण्यात आली होती. या कार्यक्रमासाठी हैदराबाद येथील १७ प्रमुख संस्थांना आमंत्रित करण्याल आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून हैदराबाद येथील. कमीशनर ऑफ पोलिस श्री महेश मुरलिधर भागवत यांना आमंत्रित केले होते. कार्यक्रमाची सुरुवात श्री विवेक देशपांडे अध्यक्ष, महाराष्ट्र मंडळ, यांच्या स्वागत भाषणाने झाली. श्री कुंभोजकर प्रधान कार्यवाह बृहन्महाराष्ट्र मंडळा यानी मंडळाच्या वतीने महाराष्ट्र मंडळास व इतर संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या व मंडळाच्या कार्या संबंधी माहिती दिली. प्रमुख पाहुणे श्री महेश मुरलीधर भागवत यांचे वक्तव्य झाले. त्यानी संपूर्ण बृ.म.मं. कार्यकारिणीला वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या व बृ.म.म.च्या .कार्याचे कौतुक केले. बृ.म.मं.चे कार्याध्यक्ष यांना शुभेच्छा दिल्या व आपल्या पुढील कार्यनियोजन संबंधी माहिती दिली. महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष यांच्या हस्ते बृहन्महाराष्ट्र मंडळ कार्याध्यक्ष श्री मिलिंद महाजन यांचा सत्कार करण्यात आला. संपूर्ण कार्यकारिणीचा सत्कार मंडळाचे (विश्वस्त) अध्यक्ष सौ. अंजली पोफ डे व मंडळाच्या कार्यवाह सौ.गीता कारे यांच्या हस्ते करण्यात आला. उपस्थित हैदराबाद येथील १७ मराठी संस्थांतर्फे श्री मिलिंद महाजन व इतर पदाधिकारी यांचा सत्कार करण्यात आला या कार्यक्रमाचे संयोजन सौ. गीता फाटे व श्री दिपक कर्पे कार्यवाह बृहन्महाराष्ट्र मंडळ यानी केले. मंडळाच्या वर्धापन दिना निमित्त हैदराबाद येथील उपस्थित संस्थेचा सत्कार बृ.म.मं.चे कार्याध्यक्ष श्री मिलिंद महाजन यांच्या हस्ते करण्यात आला. व सर्व संस्थांना बृ.म.मं. तर्फे स्मृति चिन्हे देण्यात आली. या कार्यक्रमाचे संचालन बृ.म.मं. चे कोषाध्यक्ष व म.मं. हैदराबाद विश्वस्त सचिव श्री जी.के. दातार यानी केले. श्री आनंद कुलकर्णी यांच्या आभार प्रदर्शना नंतर क़ार्यक्रम संपुष्टात आला. एकूण कार्यक्रमाचे नियोजन उत्तम होते.

## जयपुर येथे वर्धापन दिन साजरा

**जयपुर.** ( विजय पित्रे ) दरवर्षीप्रमाणे यंदापण जयपुर महाराष्ट्र मंडळात दि. 5 एप्रिल 2018रोजी बृममं नवी दिल्ली चा 93वां वर्धापन दिन आयोजिला गेला. कार्यक्रमा प्रसंगी उपस्थित सभासदांना बृहन्महाराष्ट्र मंडळाची स्थापना. त्याचे उपक्रमांबाबत माहिती पुरविण्यात आली. तत्पूर्वी मंडळाचे अध्यक्ष श्री. संजय कर्णिक आणि सरचिटणीस श्री. मुकुंद सोहोनी व इतर मंडळीचे बृममं च्या वतीने स्वागत केले गेले. बृममं च्या कार्याची गति राजस्थानात अजून वाढविण्याची शक्यता आहे आणि येत्या दोन-तीन वर्षांमधे राजस्थानामधील मराठी संस्थांना एकत्र आणून मध्यवर्ती संघटनेचे कार्य गतिमान करावे असा सर्वांचा विचार आला. श्री कर्णिक ( अध्यक्ष ) यांनी पण हेच हटले कि संघटनेचे नवीन उपक्रम हाताळावे सभासदांची संख्या वाढवावी, तसेच सन 2020-21 मधे ज.म.मं. जयपुर चे अमृत महोत्सवी वर्ष असल्याने बृममं चे वार्षिक संमेलन गुलाबी शहरात व्हावे असे मध्यवर्ती संघटने ला सुचवावे. सर्वांना या प्रसंगी शुभेच्छा देवून कार्यक्रमाची सांगता श्री विजय पित्रे यांनी केली.

## अहमदाबाद येथे मंडळाचा वर्धापनदिन साजरा

**अहमदाबाद.** (अंजली पराडकर) महिला विकास मंडळ,कांकरिया, अहमदाबाद येथे बृहन्महाराष्ट्र मंडळ,नवी दिल्ली या संस्थेचा वर्धापनदिन साजरा करण्यात आला. त्यावेळी सौ. आश्लेषा देशपांडे या मुख्य पाहुण्या होत्या, महिला विकास मंडळाच्या सेक्रेटरी सौ.अर्चना फासे यांनी उपस्थितांचे, पाहुण्यांचे स्वागत केले व आश्लेषा देशपांडे यांचा परिचय करुन दिला व त्यांना बृहन्महाराष्ट्र मंडळाविषयी माहिती सांगण्याची विनंती केली. आश्लेषाताईंनी पण बृहन्महाराष्ट्र मंडळा, विषयी खूप छान व अगदी विस्तृत माहिती सांगितली व त्यांना या कार्यक्रमासाठी बोलाविले त्याबद्दल मंडळाचे आभार मानले. मंडळाकडून त्यांना भेट देण्यात आली. त्यानंतर महिला विकास मंडळाच्या विश्वस्त सौ.वासंती पंडित यांनी परदेशाता बृहन्महाराष्ट्र मंडळाचे काम कसे चालते व मंडळाची आपल्याला कशी गरज आहे ते सांगितले.म.वि.मंडळाच्या दुसऱ्या विश्वस्त अंजली पराडकर यांनी बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या वर्धापनदिनाबद्दल सांगितले व आज तो साजरा करण्याची संधी म.वि. मंडळाला मिळवून दिल्याबद्दल बृ.म.मं.त सह कोषाध्यक्ष म्हणून बिनविरोध निवडून आलेल्या येथीलच श्री अशोक कापुरे यांचे अभिनंदन करून आभार व्यक्त केले. त्यानंतर सामान्य ज्ञान व एक लकी गेम अशा दोन स्पर्धा घेतल्या.सामान्य ज्ञान स्पर्धेत आश्लेषा देशपांडे यांचा पहिला व सुनयना पळसुले यांचा दुसरा क्रमांक आला.लकी गेम मधे ज्योती हमीने , रोहिणी जोशी,अरूणा परांजपे यांचे अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय असे क्रमांक आले. विजेत्यांना रोख पारितोषिके देण्यात आली.सर्वांचे आभार म.वि.मं.अध्यक्षा नैना फाटक यांनी मानले, विशेष करून श्री कापुरे व बृहन्महाराष्ट्र मंडळाचे, व बृहन्महाराष्ट्र मंडळाला वर्धापनदिनाच्या शुभेच्छा दिल्या.म.वि.मंडळाची प्रार्थना संत तुकाराम महाराजांचा अभंग म्हणून कार्यक्रम संपला. आजचा अल्पोपहार हा वसंतोत्सवाला साजेसा कैरीची डाळ व पन्हे असा देण्यात आला. वर्धापनदिनानिमित्ताने एकत्र जमलेल्या भगिनींनी गौरीची आरास करून एकमेवीना हळदकुंकू, बत्तासे ,चणे देऊन तो पण आनंद लुटला. या आनंदा साठी बृहन्महाराष्ट्र मंडळाचे खूप खूप आभार.

## बेळगाव येथे वर्धापन दिन

बेळगाव येथे मराठी भाषा प्रेमी मंडळ संलग्न संस्था बृहन्महाराष्ट्र मंडळ नवी दिल्ली, यांच्या माध्यमातून बृहन्महाराष्ट्र मंडळ वर्धापनदिन साजरा केला.चिकुंबीमठ बालसुधार गृहात वैयक्तिक भेट देऊन रु. 1500/- हा एका भोजन व्यवस्थेचा भाग देण्यात आला. मराठी भाषा प्रेमी मंडळाचे पदाधिकारी सर्वश्री परशुराम माळी, अशोक केळकर, गुरुदत्त पेडणेकर व सुधीर यांनी विशेष परिश्रम घेतले

## रायपूर येथे वर्धापन दिन

बृहन महाराष्ट्र मंडळ च्या वर्धापन दिवसा निमित्त रायपुर महाराष्ट्र मंडळ ने वृक्षारोपण आणि समाजा च्या हितार्थ परिचर्चा आयोजित केली, बृहन महाराष्ट्र मंडळ आणि रायपुर महाराष्ट्र मंडळ च्या संयुक्त तत्वावधानात लवकरच छत्तीसगढ़ स्तरीय मराठी भाषिकांचे सम्मेलन आयोजित करण्याचे ठरवले, ह्या प्रसंगी सर्वश्री शेखर अमीन, अनिल काळेले, अजय काळे, चेतन दण्डवते, सौ. अनीता नलगुंडवार, दीपक किरवईवाले, सुबोध टोले, श्याम सुंदर खंगन, श्रीमती नमिता शेष, रामदास जोगळेकर, रविंद्र ठेंगड़ी, सौ. रेणुका पुराणिक, राजेश नलगुंडवार, प्रफुल्ल बड़वाईक सहित अनेक संदस्य उपस्थित होते।

**जबलपुर येथे नूतन मराठी प्राथमिक व माध्यमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी बृहन्महाराष्ट्र मंडळाचा वर्धापन दिन साजरा केला.**

**हैदराबाद प्रवासात कार्याध्यक्ष श्री मिलिन्द महाजन व मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी विवेक वर्धिनी एज्युकेशन सोसायटी ला भेंट दिली. या प्रसंगी सोसायटीचे अध्यक्ष डॉ आनंद अबकारी व कार्यकारिणी सदस्य पण उपस्थित हेते.**

# बृहन्महाराष्ट्र मंडळ, नवी दिल्ली

☐ सूर्यकांत कुळकर्णी, मुंबई

सतराव्या व अठराव्या शतकात मराठ्यांचे राज्य सर्व भारतभर पसरले होते. श्री शहाजी महाराजांच्या तंजावरकडील स्वाऱ्या झाल्या. आजचे म्हैसुर हेही मराठ्यांनी पूर्वी जिंकले होते. तेथील संस्थानचे बरेच दिवाण मराठी भाषिक होते. राघोबांनी उत्तरेकडे अटकेपार भरारी मारली तर नागपूरकर भोसल्यांनी बिहार, ओरिसा, बंगालकडे स्वाऱ्या करुन मराठी राज्याच्या कक्षा रूंदावल्या. यामुळे ग्वाल्हेर, बडोदे, इंदूर, देवास, धार इ. त्या वेळच्या मराठी राज्यांत मराठी माणसे मोठ्या प्रमाणावर स्थायिक झाली. नंतरच्या शतकांत ब्रिटीशांचे राज्य आले व उद्योग धंध्यासाठी, नोकरी निमित्ताने मराठी माणसे पर प्रांतात जाऊलागली. त्यांच्या पाच-दहा पिढयांचा जीवन काल तेथेच लोटला. आपला मराठी बाणा, आपली मायबोली, आपला सांस्कृतिक वारसा परप्रांतात टिकवून ठेवण्याचे कार्य ही मराठी माणसे अनेक वर्षे करीत होती. हे कार्य एकत्रित येऊन संघटने द्वारे करण्याच्या दृष्टीने त्यावेळच्या बांधवांनी महाराष्ट्र समाज अथवा मंडळांसारख्या संस्थांची स्थापना केली. भाषा टिकवून ठेवण्यासाठी मराठी शाळा व ग्रंथालये सुरू केली. शारीरिक बळ वृद्धिंगत करण्यासाठी व्यायामशाळा काढल्या. अनेक ठिकाणी मंदीरे स्थापून भजन, कीर्तन, प्रवचनांद्वारे प्रबोधनाचे कार्य केले.

1925 मध्ये कानपुर येथे कांग्रेस व हिंदुसभा यांची एकाचवेळी अधिवेशने होती त्याचा लाभ घेऊन, कै. तात्यासाहेब केळकर यांनी बृहन्महाराष्ट्र चळवळ संघटीत करण्याच्या दृष्टीने सर्व महाराष्ट्रीय पुढाऱ्यांना एकत्र आणून बृहन्महाराष्ट्र मंडळाची मुहूर्तमेढ रोवली. या सभेस कानपूर, दिल्ली, लखनौ, अहमदाबाद, कलकत्ता, बनारस, झांशी, सागर वगैरे ठिकाणचे प्रतिनिधी उपस्थित होते. या सर्व संस्थांचे कार्य जास्त सूत्रबद्ध करण्यासाठी त्यांच्या समान उद्देश्याबाबत विचार विनिमय व्हावा, मराठी भाषा, संस्कृतीचे संवर्धन व प्रसार व्हावा, मराठा तेतुका मेळवावा म्हणून त्यांचे मेळावे घडवून आणावे या दृष्टीने 1926 साली बृहन्महाराष्ट्र परिषदेचे प्रथम अधिवेशन झांशी येथे श्री. ज.स. उपाख्य तात्यासाहेब करंदीकर यांचे अध्यक्षतेखाली संपन्न होऊन **बृहन्महाराष्ट्र मंडळ या मध्यवर्ती केंद्रीय संस्थेच्या कार्यास सुरुवात झाली.** बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या स्थापने पासून अखिल भारतीय स्वरूपाची 68चे वर अधिवेशने पार पडली आहेत. ह्या अधिवेशनांतून बृहन्महाराष्ट्रातील मराठी लोकांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न झाला, या संमेलनां मधून अनेक थोर विचारवंत, शिक्षणतज्ञ, समाजपुढारी, राजकीय नेते यांनी वेळोवेळी अध्यक्षता स्वीकारून मार्गदर्शन केले. स्वातंत्र्यपूर्व काळात स्वातंत्र्य प्रेमाने भारावलेली मंडळी बृहन्महाराष्ट्र चळवळीत महाराष्ट्र व मराठी प्रेमा बरोबरच देशप्रेमाचे स्फुल्लिंगही चेतवीत होती. ही अधिवेशने अनेक प्रांतातून निरनिराळ्या 30 हून अधिक शहरांमध्ये आता पर्यंत झाली. झाशी, कलकत्ता, दिल्ली, ग्वाल्हेर, कानपूर, भोपाळ, हैदराबाद या ठिकाणी ही अधिवेशन दोन वेळा विंसवा त्याहून अधिकदा झालीत. 1940 साली कराची ला संमेलन झाले होते. बृहन्महाराष्ट्र मंडळ दिल्ली येथे रजिस्टर्ड असून संस्थेचा नोंदणी क्र.एस.1308/58-59 दि. 29.9.1958 आहे. वर्षातून एकदा संमेलने घेऊन स्वस्थ न बसता सततचा संपर्क साधण्याच्या दृष्टीने बृहन्महाराष्ट्र मंडळाने स्वत:चे मुखपत्र प्रकाशित केले. सुरुवातीस 'बृहन्महाराष्ट्र मासिक' या नावाने हे नियतकालिक निघाले. 1935 मध्ये 'महाराष्ट्र विस्तार' या नावाने नियतकालिक प्रकाशनाची नव्याने सुरुवात झाली. 1967 च्या रतलाम अधिवेशनांत पुन्हा एकदा बदल होऊन मुखपत्राचे शीर्षक 'मायमराठी' करण्यांत आले. ते सध्या बृहन माय मराठी नावाने सुरू आहे. या मासिकाचे कामी सर्वश्री पु. दि. जोशी, कै. भा.रा. खरे, डॉ. पा.वा. सुखात्मे, कै. पु. शे. पतकी डॉ. शं.अ. खरे, कै. के.ना. डांगे, य. वि. नामजोशी, डॉ. बलवंत पाटील, श्री प्रभाकर तेलंग, कै. द. न. पंडीत व अरविंद भंडारी, गोपाळ अगाशे, जी.पी.दातार सह हैदराबादचे बांधव धनंजय कुळकर्णी व कांचन जतकर यांनी वेळोवेळी संपादक पदाचा भार उचलला व बृहन्महाराष्ट्र चळवळीचा झेंडा फडकत ठेवला. सध्या 'बृहन माय मराठी'ची व्यवस्थापकीय व संपादकीय श्री अश्विन खरे व सहकारी जबाबदारी इंदूरच्या उचलली आहेत. एक महत्वाचे प्रकाशन 'बृहन्महाराष्ट्र संस्था परिचय सूची'च्या तीन आवृत्तया प्रकशित झाल्या असून चौथी आवृत्ति ही प्रकाशनच्यामार्गावर आहे. गेली तीन वर्षे बृहन्महाराष्ट्र मंडळ वार्षिक दिनदर्शिका (मराठी कॅलेंडर) प्रकाशित करत आहे.

कै. ज.स. उपाख्य तात्यासाहेब करंदीकर यांनी बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्षपद 1925 ते 1948पर्यंत भुषविले. नंतर 1948ते 1965 पर्यंत कै. न. वि. उपाख्य काकासाहेब गाडगीळ यांनी अध्यक्षपद स्वीकारून संघटणेचे नेतृत्व केले. पुढे अध्यक्षपदाची धुरा कै. यशवंतराब चव्हाण यांनी संभाळली. त्यानंतर 1980 पासून 1991 पर्यंत श्री वसंतराव साठे यांनी अध्यक्षपदाची जबाबदारी यशस्वीरीत्या पार पाडली. नंतर दोन वर्षे बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष केन्द्रीय मंत्री श्री. शरदराव पवार होते. 1993 ते 1996श्री साठे यांनी पुन्हा अध्यक्ष पदाचीं धुरा सांभाळली. नंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री मनोहर जोशी अध्यक्ष होते. या नंतर सौ सुनिता काळे, श्रीमती मीनाताई पिंपलापूरे, श्री संजय पांडे व श्री विलास बुचके कार्याध्यक्ष झाले. नवनिर्वाचित कार्याध्यक्ष श्री मिलिन्द महाजन आहे. ६८व्या अधिवेशनात निवडणूकी नंतर अध्यक्षांच्या मार्गदर्शनाखाली सरचिटणीस म्हणून 1939 ते 1951 पर्यंत श्री पु. शं. पतके यांनी मोलाची कामगिरी बजावली. पुढे 1951 ते

1956ते कार्याध्यक्षही होते. त्यानंतर सरचिटणीसाची जबाबदारी श्री ना. र. टिकेकर यांनी सांभाळली. पुढे प्रधान कार्यवाह म्हणून कै. रमेश मुळगुंद यांनी 1979 पर्यंत सुमारे पंधरा वर्षे चळवळीत जोमाने चैतन्य निर्माण केले.नंतर श्री वा. ग. कुळकर्णी, श्री मु. रा. गोखले, श्री सतीश सोनवळकर, श्री श्रीधर नेवाळकर, श्री चंद्रशेखर गर्गे, वैस. उपेन्द्र केळकर व सूर्यकांत कुळकर्णी, अरविंद दीक्षित, शांताराम मोघे, दिलीप कुंभोजकर, संजय कर्णिक, शेखर अमीन, डॉ. रवि गिऱ्हे यांनी प्रधान कार्यवाहपदी कार्य केले. सध्या श्री दिलीप कुंभोजकर, हे पद सांभाळत आहेत. याशिवाय बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या कार्यात विशेष सक्रीय राहीले त्यांत वैस. बा. वा. गाडगीळ, श्री चिंतामण कांड, श्री ल.रा. पेंढारकर, श्री शंतनु भट, श्री सूर्यकांत कुळकर्णी इ. कार्यकर्ते आहेत. मंडळाची आर्थिक बाजू सांभाळण्याचे कार्य कोषाध्यक्ष म्हणून वैस. अनंतराव कठाळे व श्री. राम कठाळे, श्री ज.शं.वाटाणे, श्री शारंगधर भांदक्कर, श्री जी. केदातार व श्री कुंभजकर ह्यांनी जपले आहे. सध्या श्री श्री जी.के. दातार पुन्हा कोषाध्यक्ष आहेत. महाराष्ट्र शासनातर्फे अधुन मधुन बृहन्महाराष्ट्र मराठी संस्थांना आर्थिक अनुदान दिले जाते. बृहन्महाराष्ट्र मंडळ या बाबतीत महाराष्ट्र शासनास योग्य सल्ला देते व त्यानुसार अनुदानाची रकम ठरविली जाते. महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या रौप्यमहोत्सवानिमित्त 36 संस्थाना प्रत्येकी रुपये पंचवीस हजार देण्यांत आले. जागतिक मराठी परिषदेचे वेळी महाराष्ट्र सरकारतर्फे पुन्हा एकूण रु. 24 लाखांची रकम बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या सल्याने संस्थांना देण्यात आली. दरवर्षी रु. एककोटी किंवा त्याहून अधिकची रकम बृहन्महाराष्ट्रांतील संस्थांना मिळावीम्हणून अंदाज पत्रकांत महाराष्ट्र सरकारने कायम स्वरूपाची तरतुद करावी यासाठी केलेल्या प्रयत्नांना सफलता प्राप्त झाली आहे. याचा एक लाभ म्हणजे बृहन्महाराष्ट्र मंडळाची स्वत: च्या मालकीची वास्तु दिल्लीत घेण्यात आली आहे. वास्तुचा पत्ता 10056/2, मुलतानी ढांडा, गल्ली नं. 2, (बृहन्महाराष्ट्र भवना मागील दुसरी गल्ली). पहाडगंज, नवी दिल्ली - 11 005 असा आहे. यामुळे संघटनात्मक चळवळीस कार्यालयीन कामाची दैनंदिन जोड लाभून अनेक योजना राबविता येतील.

वार्षिक संमेलन व 'बृहन माय मराठी' प्रकाशन या उपक्रमांत भर घालून 1992 पासून नवोदित कलाकारांची शास्त्रीय संगीत स्पर्धा सुरुकरण्यांत आली. त्यांत बृहन्महाराष्ट्रांतील अनेक कलाकारांनी भाग घेतला. बृहन्महाराष्ट्रांतील विद्यार्थ्यांसाठी मराठी भाषेच्या चाचणी परिक्षा व उद्योजक जागरूकता शिबीर, हे नवे उपक्रमही सुरू करण्यांत आले आहेत. बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे प्रांतिक व उपप्रांतिक विभागीय संमेलनेही घेतली जातात. निरनिराळ्या संस्थांच्या विश्वस्तांची दोन वेगळी संमेलने घेण्यात आली. तसेच पतपद्ग्यांपुरते एक संमेलन झाले. बृहन्महाराष्ट्रांत सुमारे एक हजारहून अधिक निरनिराळ्या मराठी संस्था, मराठी भाषा व संस्कृती जतन करण्याचे कार्य करीत आहेत. नव्या संस्थांची यात भर पडत आहे. बृ.म. मंडळाचे साढे चार हजारहून अधिक आजीव सभासद आहेत. मराठी भाषेत प्राथमिक शिक्षण, आपल्या वैशिष्ट्यांची अन्य प्रांतीयांना ओळख करून देणे, मराठी साहित्य इतर भाषांमध्ये अनुवादित करणे, मुला मुलींचे विवाह जुळवणे, मराठी प्रवासूंची सोय करणे, मराठी ग्रंथालये चालविणे मराठी भाषिकांची सर्वांगीण उन्नती करणे इ. अनेक प्रश्न या संघटणे द्वारे सोडविता येतील. या मध्यवर्ती संस्थेच्या उपयुक्ततेबद्दल महाराष्ट्रीय वर्ग हळू हळू जागरूक होत आहे. स्थानीय वातावरण व प्रश्नांशी समरस व्हावे हे राष्ट्रीय भावनेच्या दृष्टीने उचितच आहे. बृहन्महाराष्ट्रांतील मराठी संस्था महाराष्ट्राचे दुतावास म्हणून मुळ संस्कृतीशी जो दुवा साधत आहेत तो राष्ट्रीय भावनेला निस्संशय पोषक आहे. महाराष्ट्रातील शासन व सार्वजनिक संस्थांनी बृहन्महाराष्ट्रांतील संस्थांना सर्वतहहेच्या मदतीचा पुरवठा करणे अत्यंत आवश्यक आहे. तसे झाल्यास मराठी भाषा व संस्कृती जतन करण्याच्या बृहन्महाराष्ट्राच्या कार्यात चैतन्य टिकून राहील.

**बृहन्महाराष्ट्र मंडळाचे नवे संकेत स्थळ** **www.bmmindia.org.in**

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे नवे संकेत स्थळ आपल्या सर्वांसाठी सुरू करताना आम्हाला विशेष आनंद होत आहे कारण ह्या राष्ट्रीय संस्थेची माहिती मराठीभाषिकांना मिळावीत सेच मंडळ आणि त्याचा संलग्न संस्थाजे कार्यक्रम करतात व सामाजिक उपक्रम करीत आहेत त्याची माहीती, फोटो सदस्यांना एकाठिकाणी मिळावी हात्या मागील प्रमुख उद्देश असलातरी त्यासोबत मराठी उद्योजकांना/कलाकाराना एका ठिकाणी आपली जाहिरात करून सम्पर्क करण्या चे माध्यम आम्ही उपलब्ध करून देत आहोत. समस्त संस्था आणि त्यांचे प्रतिनिधी ही माहिती संकेत स्थळावर कार्यक्रम अहवाल ह्या विकल्पाचा उपयोग करून पाठवू शकतात. समस्त सभासदांना एक महत्वाची सुविधा ह्या संकेतस्थळावर आम्ही उपलब्ध करून दिली आहे आणि ती म्हणजे आपण स्वत: आपली समस्त माहिती अर्थात नाव, पत्ता इत्यादीचे अवलोकन ह्या संकेत स्थळावर करू शकता आणि त्या मध्ये सुधार देखील सुचवू शकता. अर्थातच ही सुधारित माहिती आमच्या प्रतिनिधी द्वारे दूरध्वनीच्या माध्यमातून सत्यापित केली गेल्या नंतर स्वीकारली जाईल. ह्या सुविधे मुळेअसंख्य सभासद, जे कालातीत अथवाचुकीच्या पत्त्या मुळे 'बृहन माय मराठी' आणि इतर टपाल संवादास मुकतात, आपला पत्ता सुधारून ह्या पुढे प्रेषित टपाल साहित्य प्राप्त करू शकतील तसेच मंडळाच्या वाटचालीशी अद्यतनित होऊ शकतील. इतकेच नव्हे तर ह्या संकेतस्थळा च्या माध्यमातून आपणआपल्या सूचना, तक्रार किंवा हव्या असलेल्या माहिती संबंधी प्रश्न इत्यादी सभासद संवाद ह्या विकल्पाच्या माध्यमातून प्रेषित करू शकता. येत्या काळात आपण दिल्ली येथील मंडळाच्या सदनिकेचे बुकिंग, 'ऋणानुबंध' हे वरवधू माहीती पटल इत्यादी सारख्या सभासदोपयोगी सुविधा आम्ही ह्या संकेत स्थळावर लवकरच सुरू करण्याचा मानस बाळगून आहोत. आपण सर्वांनी नवीन वेबसाईटचा उपयोग करावाव नवीन टेक्नोलॉजीचा लाभघ्यावा व आपल्या परिचित सभासदांना व तसेच परिचित मराठी भाषिकांना या संकेतस्थळा संबंधीची माहिती देऊन सहयोग करावाही विनम्र विनंती. समस्त कलाकार / उद्योजक/ जाहिरातदार आपल्या जाहिरातीं च्या संदर्भात वेबसाईट प्रभारी शी advertisement@bmmindia.org.in ह्या ईमेल आय.डी. वर संपर्क करू शकतात. धन्यवाद **- दिलीप कुंभोजकर, प्रधानकार्यवाह**

*इंदूरला 10 फेब्रुवारी 2018रोजी मराठी साहित्य अकादमी, मप्र मराठी साहित्य संघ आणि लिवा क्लब इंदूर दवारे आयोजित पत्रकारिता परिसंवादात मध्यप्रदेशाचे प्रिंट-सोशल-टेली मिडिया सह वेब स्पेस व ब्लॉग रायटर पण उपस्थित होते.*

# पत्रकारितेचे बदललेले स्वरूप, आव्हाने आणि सामाजिक बांधिलकी

☐ अजय बोकील

आज भारता सकट संपूर्ण जगात पत्रकारितेचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. पारंपरिक पत्रकारितेची जागा आता नवीन माध्यम किंवा न्यू मीडिया घेत आहे. हा ट्रेंड अजून वाढत जाणार आहे. 21 व्या शतकात माध्यमांची व्याप्ती आणि प्रभाव पहिल्या पेक्षा खूप वाढला आहे. त्याच प्रमाणात समाजात आणि जीवनांच्या विविध क्षेत्रात त्याचे अनुकूल आणि प्रतिकूल परिणाम दिसून येत आहेत. एका दृष्टिनं ही गोष्ट चांगली असून दुसऱ्या दृष्टिनं ही चिंतेची बाब आहे. कारण की येणाऱ्या काळात समाज कसा घडणार आहे आणि त्यात माध्यमांची भूमिका कशी आणि कितपत असणार आहे, तिच्या भूमिके मुळे समाजाला कोणती दिशा मिळेल किंवा मिळाली पाहिजे, मिडियाची ची सामाजिक बांधिलकी काय असावी या सर्व प्रश्नांवर आज गांभीर्यानं विचार करण्याची गरज आहे.

ह्याचं मुख्य कारण की आज पारंपरिक मिडिया वर्तमान पत्रं, मासिकं, टीव्ही, रेडियो इत्यादींची जागा न्यू मीडिया झपाट्यानं घेतो आहे. नवी पिढी पुस्तकात डोकं खुपसण्या ऐवजी नेट वर सगळं विश्व सर्च करते. अर्थातच न्यू मीडिया म्हणजे इंटरनेट आधारित मीडिया. याची व्याप्ती वैयक्तिक पासून वैश्विक पर्यंत आणि जगाच्या काना-कोपऱ्या पर्यंत आहे. ह्याचा अर्थ असा की बदलत्या काळात मिडिया अत्यंत तीव्र आणि सरळ भाषेत संवाद करणारा असणार आहे. ह्या न्यू मीडिया नं पत्रकार आणि सामान्य लोकांपुढे सुद्धा ज्ञानाचं एक मोठ्ठं विश्व खुलं केलं आहे. त्याला काही तोड नाही पण याच बरोबर न्यू मीडिया नं सामाजिक मर्यादा, नैतिकता आणि लोकांच्या खाजगी जीवनाच्या सुरक्षिततेशी निगडित गंभीर प्रश्न ही समाजाचे पुढे उभे केले आहेत.

समाज बदलतो तसा मीडिया ही बदलतो आणि मीडिया बरोबर समाज ही बदलतो. दोन्हींचे सम्बन्ध परस्पर गुंतागंतीचे आहेत. आता ओल्ड मीडिया वर्सेस न्यू मीडिया असे चित्र ही उभे केलं जात आहे. कुठल्याही बाबतीत खोलात जाण्याची आणि संयमानं विचार करण्याची वृत्ति आणि तसा आग्रह कमी होत चालला आहे. गुजरात च्या डीए आयआयसीटी यूनिवर्सिटी च्या जनसंचार विभागाचे प्रोफेसर विनीत कौल यानी जुन्या आणि नव्या मीडिया चा सुंदर तौलनिक अभ्यास केला असून काही निष्कर्ष काढले आहेत. त्यानुसार ओल्ड मीडिया ची वृत्ती लेक्चर देणारी असून न्यू मीडिया संवाद आणि संभाषणावर जोर देतो, ओल्ड मिडिया कुठल्याही टीके ला 'अटैक' समजतो तर न्यू मिडिया त्याला टीकाच समजून त्यातून पुढे जाण्याचा मार्ग शोधतो. ओल्ड मिडिया चा जोर 'ट्रेडिशनल कल्चर' वर तर न्यू मिडियाचा काउंटर कल्चर वर आहे. ओल्ड मीडिया काही मापदंडाना धरून चालणारा आहे तर न्यू मीडिया ओपन टू ऑल आहे. ओल्ड मीडिया हा 'सेफ गेम' खेळणारा आहे तर न्यू मीडिया बेधड़क चुका करतो आणि माफी मागून पुढची वाट धरतो. प्रो. कौल यांच्या निष्कर्षांवर काही लोक असहमत असतील पण यात बरचसं सत्य आहे, हे नक्की.

पत्रकारितेचे जे स्वरूप बदलले आहे, त्यात मुख्यत्वे पत्रकारितेचा विषय विस्तार, माहिती मिळविण्याची विविध साधनं, फारशी चिकित्सा न करता लगेच निष्कर्ष काढण्याची वृत्ती, बेजवाबदारपणा आणि सूचनांचा सतत भडिमार आहे. त्यामुळे एकीकडे सर्व जग आपसांत खूप जोडलं गेलं आहे तर दुसरी कडे माणूस हा जास्त एकलकोंडा होत चालला आहे. त्याच्या वैयक्तिक संपर्काचा विस्तार होत असला तरी समाजाशी त्याचा संपर्क घटत चालला आहे तो जास्त व्यक्तीनिष्ठ आणि स्वत:चं भलं पाहण्यात गुंग झाला आहे. हीच प्रवृत्ती मिडिया मध्ये ही वाढत आहे. मिडिया संस्थानं संपूर्ण समाजाचं भलं बघण्या ऐवजी स्वत:चाच फायदा बघत आहेत. हा फायदा आर्थिक, राजकीय किंवा अन्य कुठल्या ही स्वरूपाचा असू शकतो. संचार साधनं खूपच सुलभ झाल्या मुळे माणसाला इतरांशी सम्बन्ध ठेवण्याची गरजच कमी करून टाकली आहे. समाज माणसापासून तयार होतो. जर माणूसच समाजापासून दुरावला तर त्या समाजाला काय अर्थ राहणार आहे, हा सगळ्यात

मोठा आणि कठीण प्रश्न आहे. ह्या प्रश्नावर विचार सत्रात गांभीर्यानं चर्चा करायला हवी.

एक आणखी गंभीर प्रश्न नव्या माध्यमांचं निर्बंध वर्तन हा आहे. आज सोशल साइट्स हे अभिव्यक्ती आणि माहितीचं सगळ्यात मोठं माध्यम झालं आहे आणि त्यात दर रोज वृद्धी होत आहे. आज भारतात फेसबुक चे सरासरी 24 करोड़ तर ट्वीटर वर 2.5 करोड़ यूजर्स आहेत. ह्याचा अर्थ असा की इतकी माणसं ह्या साइट्स वर आपले मत, माहिती आणि प्रतिक्रिया सतत व्यक्त करीत असतात. माणसाच्या अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्याच्या दृष्टिनं जरी हे योग्य असलं तरी समाज नियमांच्या दृष्टिनं ते पूर्ण पणे योग्यचं असेल असे नाही. कारण समाज हा काही मर्यादा आणि परंपरेच्या पालनावर टिकलेला आहे आणि त्याच प्रमाणे तो बदलत्या काळाची नवी आह्वाने स्वीकारत पुढे जात असतो. पण सोशल मिडिया ने ह्याच क्षीण पडद्याला चिरा पाडल्या आहेत. सोशल साइट्सवर लोकं बिना तपासणी करता काही ही पोस्ट करतात आणि त्याला पुढे फारवर्ड करतात. ह्या मागे उद्देश्य चांगला आणि वाईटही असू शकतो. उदाहरणार्थ अण्णा हजारें च्या भ्रष्टाचारविरूद्ध आंदोलनाला बळ देणे किंवा दिल्लीत निर्भया कांड विरूद्ध तरूणांचा आक्रोश व्यक्त होण्याला सोशल मीडिया मुळे खूप ताकद मिळाली. त्यापुढे राज्य शासनाला ही झुकावे लागले. पण ह्या घटना अपवाद म्हणता येतील. जास्तकरून या माध्यमाचा वापर मनमाफिक काहीही फीड करणे किंवा कुणा विरूद्ध काहीही मोहिम चालविण्यात होत आहे. सगळ्यात काळजीचे कारण सोशल मिडियाचा राजकीय उपयोग किंवा दुरुपयोग. कुठल्या एका विचारसरणीचा निर्बुद्ध पणे प्रचार करणे किंवा विरूद्ध विचारसरणींच्या लोकांना बदनाम करणे, ह्या साठी सोशल मिडियाचा भरपूर दुरूपयोग होतो आहे, हे नक्की. ह्याचा विपरीत परिणाम त्या पारंपरिक मिडियावर होत आहे, जो अजून ही सूचना, माहिती आणि विश्लेषणा साठी प्रामाणिक गोष्टींचाच आधार घेतो. सोशल मिडियाच्या या अगांभीर्या मुळे सामान्य लोक भ्रमित होतात आणि त्यातून नवा गैरसमज निर्माण होतो. आज देशात क्षुल्लक कारणांमुळे होणारे दंगे, मारहाण आणि कत्तली मध्ये सोशल मिडियाचा ही हात आहे. अशा वृत्ती कायद्यानुसार गुन्हा असल्या तरी लोकांवर त्याचा फार असर होत नाहीए. काश्मीर मध्ये सेना आणि पोलिसांवर सतत होणारी दगड फेक किंवा पूर्वोत्तर राज्यांच्या रहिवाश्यां बरोबर होणारा दुर्वव्यहार ह्याला सोशल मिडिया पण जवाबदार आहे. ह्याचा अर्थ न्यू किंवा सोशल मिडिया हा नेहमीच तोडतो असे नाही, पण त्याची नकारात्मक बाजू ही चिंतेची बाब आहे. पारंपरिक मिडिया कुठला ही असो, त्याला काही नियम आणि नैतिक मर्यादा असतात. त्यात कोणी एक संपादक असतो, ज्याला कुठल्याही अभिव्यक्तीमुळे होणाऱ्या परिणामांची जाणीव असते. सामाजिक जवाबदारीच भान असतं. कारण तसं न करणं गुन्हा आहे. वैयक्तिक विचार जेव्हां सार्वजनिक मंचावर येतात तेव्हां त्यांचा प्रभाव आणि अर्थ हा वेगळा असतो. आज स्वत:चे विचार मांडण्या साठी फक्त वर्तमानपत्र किंवा टीव्हीच नाहीए, तुम्ही तुमचे विचार ब्लॉग, माइक्रो ब्लॉग, फेसबुक किंवा ट्विटर वर ही मांडू शकता. त्यावर कुठलीच मर्यादा नाहीए. त्या मुळे सर्वसामान्यपणे सोशल मीडियात अराजकताच असते. म्हणायला तिथे एक एडमिन असतो पण त्याची भूमिका अत्यंत मर्यादित आणि एखाद्या आण्विक संयत्रांच्या रक्षणासाठी होम गार्ड बसवल्यासारखी असते. तो फार तर एखाद्याला ग्रुप मधून काढू शकतो तेवढंच. पण जर काही चुकीचं पोस्ट झालं असेल तर त्याच्या मुळे झालेली सामाजिक हानि ही फार मोठी असते.

आजकाल ह्वाट्सएप पत्रकारिता पण जोरात सुरू आहे. हे संदेश, फोटो आणि वीडियो पाठविण्याचं सर्वात मोठं प्लेटफार्म झालं आहे. भारतातच प्रत्येक महिन्यात 20 करोड़ मैसेजेस व्हाट्स ऐप ने पाठविले जातात. ह्याच बरोबर काही अनर्गल गोष्टीपण तितक्याचं वेगाने आणि तितक्याच प्रमाणात समाजात पसरतात. काही वेळा महत्वाच्या सूचना त्वरित मिळतात तर अनेक वेळा अपुष्ट माहितीमुळे भयंकर गोंधळ पण निर्माण होतो. लोक खोट्या बातम्या आणि सूचना व्हाट्स मार्फत लोकांपर्यत पोहोचवितात. म्हणूनच आजकाल लॉ एंड ऑर्डर चा प्राब्लम झाल्यावर सगळ्यात अगोदर सोशल मीडियावर बंदी घातली जाते.

गेल्या वर्षी 'बीबीसी फ्यूचर नाउ' चे संपादक ब्रायन लुफकिन यांनी जगाला वर्ष 2050 मध्ये ज्या गंभीर आह्वानांना सामोरे जावे लागेल, ह्याचा आढावा घेत काही कारणं सांगीतली होती, त्यात एक सोशल मिडिया ही आहे. ह्याचे मुख्य कारण की सोशल मिडिया ज्या वेगाने माणसाच्या प्रायवेसीत दखल देत आहे, त्यामुळे अनेक नवे सामाजिक प्रश्न निर्माण होत आहेत आणि येणाऱ्या काळात ते आणखी गंभीर होतील, हे नक्की. जर सोशल मिडिया च्या या गैरवर्तना मुळे माणसाचा माणसावरूनच विश्वास उडाला तर समाजाचं काय होईल, हे मोठं आह्वान पत्रकारिते सकट संपूर्ण समाजापुढे उभे आहे. कारण एकीकडे संवाद वाढेल तर गैरसमज ही वाढतील. ह्या व्यतिरिक्त सतत होणारा माहितीचा भडिमार हा माणूस कितपत पचवू शकेल, त्याच त्याला अजीर्ण तर नाही होणार, त्याच्या खाजगी जीवनात कितपत ढवळाढवळ असेल ह्यावर गंभीर विचार करण्याची गरज आहे. ह्या शिवाय सोशल मिडियाच्या माध्यमातून कोणालाही ट्रोल करण्याची ची अपप्रवृत्ति वाढली आहे किंवा जाणीवपूर्वक वाढवली जात आहेत, ती येणाऱ्या काळात आणखी

त्रासदायक ठरणार आहे, हे लक्षात घ्यायला हवं. ह्यावर निर्बंध कसा घातला गेला पाहिजे ? हे कायद्यानं शक्य होणार की आत्म संयमाने, ह्या प्रश्नावर मंथन करणें गरजेचं आहे. बरेचसे आशावादी लोक म्हणतील की पत्रकारिते समोर येणाऱ्या आह्वानांना स्वीकारण्या ची तोड ही कुठुनतरी निघेल. हे सत्य असेल ही, परंतु पत्रकारिता ही बेजवाबदार, निर्बंध आणि स्वैराचारी असणं सभ्य समाजासाठी धोक्याचं ठरेल. पत्रकारितेचं मूळ उद्दिष्ट समाज कल्याण आहे, माणसाला माणासाशी जोडणे हे आहे, आपली संस्कृति आणि सभ्यता जोपासणे हे आहे, त्यात बदल,बिघाड किंवा सुधार कितपत योग्य असेल हयावर पण विचार करावयास हवा. सोशल मिडियावर लोक खूप बोलतात, किंबहुना वाजवी पेक्षा जास्त बोलतात, हे कसे थांबेल हे ही ध्यानांत ठेवायला हवे. कारण स्वस्थ पत्रकारिता तेव्हांच जगू शकेल, जेव्हां समाज ही स्वस्थ असेल. हे आव्हान वास्तविक सिविल सोसायटीला वाचविण्याचं आहे.

शेवटचं सांगायचं म्हणजे ह्या मंचावर मध्यप्रदेशातील अनेक मराठीभाषिक पत्रकार हे एकत्र आले आहेत. मध्यप्रदेश हे हिंदीभाषी राज्य असून आमच्यापैकी बहुतेक हिंदी किंवा इंग्रजी माध्यमातून काम करतात. कारण आम्हाला आमची अभिव्यक्ती त्या भाषेत पोहोचवणं जास्त सोयीस्कर वाटतं, जी भाषा आमच्या चारी कडे बोलली किंवा समजली जाते. तरी सुद्धा आपल्या मातृभाषा आणि संस्कृतीला जीवंत ठेवणं ही सुद्धा आम्हां सर्वांची जवाबदारी आहे, इतर भाषेत काम करून देखील आपली मातृभाषा आणि मराठी संस्कृती टिकविण्यासाठी आम्ही सर्व मराठीभाषी पत्रकार कसा आणि कुठल्या रीतीनं हातभार लावू शकतो, ह्यावर सर्वांनी विचार करायला हवा. भारत हा जरी आम्हां सर्वांचा राष्ट्र असला तरी ह्या राष्ट्रात आपली गौरवास्पद उप राष्ट्रीयता पण तितकीच महत्वाची आहे, हे ओळखलं पाहिजे. ●

## परिसंवाद

आपल्या अध्यक्षीय उद्‌बोधनात दिल्लीचे जेष्ठ पत्रकार व बृहन माय मराठीचे सल्लागार श्री जगदीश उपासने आपल्या सम्बोधनात म्हणाले की ' लिवा क्लब , इंदूरचे फेसबुकवर परिसंवाद घेउन त्याला श्रीसर्वोत्तममधे प्रकाशित करणे हे कौतुकास्पद आहे. आज डिजिटलमिडिया व प्रिंट मिडियाला बरोबर काम करण्याची गरज आहे . यांच्यात जीवघेणी स्पर्धा नसावी . 'पत्रकारिता बदलते आव्हान आणि सामाजिक बांधिलकी ' सारख्या चांगल्या महत्वाच्या विषयांवर परिसंवाद समाजात सतत व्हायला हवे. मायबोली प्रमाणे आपण मायबोलीसाठी विचार करतो हे कौतुकास्पद आहे. आपल्या पाळामुळांशी आपले घट्ट सम्बन्ध असले पाहिजे. . प्रत्येक भाषेचे आपले संस्कार असतात. वैचारिक प्रतिबद्धता असते. आज प्रिंट मिडियामधे पूर्ण देशात,' मलयालम मनोरमा ' प्रसारणात सर्वप्रथम आहे . या वृत्तपत्रात, भाषेचे, वैचारिकतेचे, त्यांच्या संस्कृतीचे, आपल्याला प्रभुत्व दिसून येते. हे शिकण्यासारखे आहे . भाषा टिकवून ठेवता आली पाहिजे तेव्हांच संस्कृति जपता येते. संवादाचे तंत्रज्ञान विनामूल्य असले पाहिजे. पण आज वृत्तपत्रांसाठी आपल्याला जास्त किंमत मोजावी लगते. आज मिडियाने व तंत्रज्ञानाने सम्पूर्ण व्यवस्थेला गिळंकृत केलेले आहे. प्रिंटमिडियाची वाचकसंख्या ( रीडरशिप ) कमी होत आहे . पत्रकारितेचे पारंपरिक स्वरूप बदललेले आहे . सोशलमिडिया शक्तिशाली झाला असून त्याची प्रत्येकापर्यन्त पोच आहे. स्वातंत्र्यापूर्वी आपल्या देशात पत्रकारिता एक मिशन होते. हल्ली वैचारिक कमतरता दिसून येते . वर्तमानपत्रांचे प्राथमिक कर्तव्य सर्वांना बातम्या देणे आहे . समाजात उत्तेजना किंवा अराजकता उत्पन्न करणे नाही. पत्रकारितेचे काम सल्ला देणे, किंवा पक्षपाती होणे नाही , हे पत्रकारांनी लक्षात ठेवायला हवे. मिडिया आज इतका अहंकारी झालेला आहे की तो ठरवून पक्षपाती व्यवहार करत आहे . आज तंत्रज्ञानामुळे पत्रकरितेत उद्देश्य व पारदर्शिता संपलेली आहे .तंत्रज्ञान कोणालाही केव्हांही मागे टाकू शकते हे विसरता कामा नये. आपल्या देशात अगोदर काही श्रेष्ठ संपादकांनी काही आदर्श स्थापित केलेले आहेत . हल्ली तो मार्ग आपण विसरलेलो आहोत . लोकांना काय आवडते हे वृत्तपत्र ठरवू शकत नाही , पण संपादकांना लोकांची आवड निर्माण करायला हवी. येणाऱ्या दिवसात वृत्तपत्रात बातम्या दिसतील का नाही , किंवा वृत्तपत्र किती दिवस टिकतील हे आज सांगू शकत नाही आणि इतकी आव्हानें स्वीकारुन पत्रकारिता टिकलीच तर तिचे स्वरूप काय असेल हा विषय महत्वाचा आहे. आपल्या देशात मध्यमवर्ग झपाट्याने वाढत आहे म्हणून वृत्तपत्रांची प्रसारसंख्या वाढविल्याचे विश्लेषण करता येऊ शकते , पण वृतपत्र खऱ्याअर्थाने किती लोक वाचतात हा महत्वाचा मुद्दा आहे, आणि लोकांवर वृत्तपत्रांचा प्रभाव कितपत आहे हा देखील महत्वाचा मुद्दा आहे. तंत्रज्ञान पत्रकारितेला कुठे नेईल हे सांगता येत नाही म्हणून , पत्रकारितेचे मूल्य संवर्धन होणे आणि त्यात, कुशलता असणे फार गरजेचे आहे .

## दिव्यांग बालिका गृहात योग केंद्र सुरू केले.

**रायपुर।** महाराष्ट्र मंडळाने दिव्यांग बालिका गृहात योग केंद्र सुरू केले आहे. समता कॉलोनीतल्या बालिका विकास केंद्र भवनात सकाळी 6.30 वाजेपासून आस्था काळे यांच्या मार्गदर्शनाखाली योग शिविर आयोजित केले जात आहे. मंडळ अध्यक्ष अजय काळे यांनी सांगितले कीं योग-दिवस 21 जून ला शहरातल्या पाच ठिकाणांवर योग कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

## मध्यप्रदेश शासनाने मराठी कृतीसाठी राजकवि भास्कर रामचंद्र तांबे राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर केले



डा. म.द. वैद्य

श्रीनिवास हवालदार

**भोपाळ.** वर्ष 2014 व 2015 च्या कालावधीत प्रकाशित मराठी पुस्तकांसाठी राजकवि भास्कर रामचंद्र तांबे राज्यस्तरीय पुरस्कार प्रदेशाचे संस्कृती व पर्यटन राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) श्री सुरेंद्र पटवा यांनी जाहीर केले.

संस्कृती विभागाचे मराठी साहित्य अकादमी द्वारे स्थापित वर्ष 2014 व 2015 च्या कालावधीत प्रकाशित पुस्तकांसाठी या पुरस्काराचे मानकरी इंदोरचे श्री श्रीनिवास हवालदार (काव्य विभागात - धुक्यातून प्रकाशा कडे - ग्रेसच्या कविता) व जबलपूरचे डा म द वैद्य (कथा विभागात - माझा चिकित्सा प्रवास) ठरले. या राज्यस्तरीय पुरस्कार साठी प्रत्येकी 50 हजार रोख व प्रशस्ती पत्र देण्यात यईल. हे पुरस्कार राजकवि भास्कर रामचंद्र तांबे यांच्या ग्वाल्हेर मध्ये होणाऱ्या एका कार्यक्रम प्रसंगी देण्यात येतील. वर्ष 2006पासून थांबलेले राजकवि भा रा तांबे राज्यस्तरीय पुरस्कार योजना राज्य शासनाने पुन: बहाल केले. म प्र संस्कृती परिषदच्या अंतर्गत येणारी मराठी साहित्य अकादमी ने मराठी लेखकांना प्रोत्साहन मिळावे या हेतू ने कथा वा कादंबरी व कविता वा नाट्य लेखन करीता या पुरस्काराची योजना सुरु केली. ही योजना दर केलेण्डर वर्षी प्रकाशित पुस्तकांसाठी राहील.

**महाराष्ट्रीयन समिति झांशी राणी झांशी बलिदान दिवसा वर दीप दान व पुष्पाजंलि कार्यक्रम करण्यात आले**

रायपूर महाराष्ट्र मंडळाला १९३५ साली महाराष्ट्र मंडळ हे नाव देण्यात आले. अंदाजे ४०,००० चौ. फूट जमिनीवर रायपूरच्या उच्च वसाहतीत ही इमारत उभी आहे. संत साहित्याच्या तौलनिक अभ्यासाठी मंडळाने संत साहित्य अध्ययन पीठ स्थापन केले आहे. अलिक डेच मंडळाने कार्यकारिणी शपथ ग्रहण सोहळा साजरा केला याशिवाय मार्गदर्शन मंडळ, महिला केंद्र , युवा, खेळ, कला, संस्कृती, सांस्कृतिक, शैक्षणिक, विविध नाट्य, स्वास्थ्य सेवा असे वेगवगळे उपक्रम मंडळातर्फे राबवले जातात. मंडळाने सेवाभावी कार्यामुळे राजधानीमध्ये आपली विशेष ओळख प्रस्थापित केली आहे. मंडळाच्या नेतृत्वात चालणारे दिव्यांग सेवा केंद्र , बालिका विकास गृह, विविध केंद्रात कार्यरत असणाऱ्या महिलांना महिला छात्रावास व इतर सुविधा दिल्या जातात. रक्तदान शिविर, अनाथश्रम, वृद्धश्रम इत्यादी सेवाभावी लक्षणीय कार्यही संस्थेतर्फे केली जातात. येणाऱ्या भविष्यकाळात मंडळ अन्य समाजांसाठी प्रेरणादायी ठरेल अशी मला खात्री आहे. हे प्रशंसोद्गार लोकनिर्माण मंत्री महोदय राजेश भूषण यांनी या प्रसंगी व्यक्त केले.

## भगिनी समाजाचा वार्षिकोत्सव अत्यंत उत्साहात संपन्न

**अहमदाबाद.** (आश्लेषा अतुल देशपांडे) 10 मार्च 2018रोजी दुपारी 3 वाजता भगिनी समाज संस्थेचा वार्षिकोत्सव गंगा गोविंद मंगल भुवन येथे साजरा करण्यात आला. यावेळी बडोदयाच्या सुप्रसिद्ध साहित्यिका सौ. सुषमा लेले या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहिल्या होत्या. कार्यक्रमाच्या सुरूवातीला सेक्रेटरी सौ. सुनिता चौधरी यांनी सर्वांचे स्वागत केल्यावर प्रमुख पाहुण्या, समाजाच्या अध्यक्षा सौ. प्रतिभा लेले, तिन्ही विश्वस्त (सौ. रोहिणी जोशी, सौ. उषा कान्हेरे व सौ. आश्लेषा देशपांडे) यांच्या हस्ते दीप प्रज्ज्वलन करण्यात आले. ईशस्तवन व स्वागतगीत सौ. सुरेखा देवधर, सौ. अनुराधा जोशी व सौ. प्रतिभा लेले यांनी सुस्वरांत म्हंटले. नंतर प्रमुख पाहुण्या सौ. सुषमा लेले यांचे अध्यक्षा सौ. प्रतिभा लेले यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्यांचा परिणय ट्रस्टी सौ. रोहिणी जोशी यांनीच करून दिला. संस्था परिचय ही त्यांनीच करून दिला. दुसऱ्या ट्रस्टी सौ. उषा कान्हेरे यांनी उद्योग मंडळाचा परिचय करून दिला. नंतर मनोरंजन कार्यक्रमात छोटी नाटिका सादर करण्यात आली. सौ. रोहिणी जोशी, सौ.आश्लेषा देशपांडे, सौ. अनिता जोशी, सौ. सुनिता चौधरी, सौ. सुप्रिया देशपांडे, सौ. अनुराधा जोशी, सौ. सुनंदा कानडे व सौ. संध्या थिरे यांनी या नाटिकेत महत्वाच्या भूमिका केल्या होत्या. या नाटकांचे दिग्दर्शन सौ. प्रीती जांभेकर यांनी उत्तमरित्या केले होते. तसेच सौ. स्मिता कोरडे यांच्या 'तूच माझी व्हॅलेंटाईन' या कवितेला सर्वांनीच भरभरून दाद दिली. यानंतर भगिनी. समाजातर्फे प्रकाशित करण्यात येणाऱ्या 'तरंग' या हस्तलिखिताचे प्रमुख पाहुण्या, अध्यक्षा, ट्रस्टी यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. 'तरंग' च्या संपादिका सौ. आश्लेषा देशपांडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. नंतर प्रमुख पाहुण्या सौ. सुषमा लेले यांनी उत्कृष्ट भाषण करून उपस्थितांची मने जिंकली. बक्षीस समारंभही छान रितीने पार पडला. आभार प्रदर्शन सौ. सुप्रिया देशपांडे यांनी केले. वंदेमातरम् झाल्यावर सर्वांनाच अल्पोहार देण्यात आला. बंधु-भंगिनींच्या भरगच्च उपस्थितीत हा कार्यक्रम अत्यंत उत्साहात, आनंदात संपन्न झाला.

## राजधानीत स्वातंत्र्यवीर सावरकर यांची जयंती साजरी

**नवी दिल्ली.** थोर क्रांतिकारक स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची जयंती आज महाराष्ट्र परिचय केंद्रात साजरी करण्यात आली. कोपरनिकस मार्ग स्थित महाराष्ट्र सदनातील सभागृहात आयोजित कार्यक्रमात सहायक निवासी आयुक्त समीर सहाय, सहायक निवासी आयुक्त सुमन चंद्रा यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. अपर निवासी आयुक्त राजीव मलिक यांच्यासह महाराष्ट्र सदन तसेच महाराष्ट्र परिचय केंद्राचे अधिकारी व कर्मचारी या वेळी उपस्थित होते. उपस्थित अधिकारी कर्मचाऱ्यांनीही या वेळी प्रतिमेस पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली.

## महाराष्ट्र समाज अहमदाबाद येथे 'गुढीपाडव्या' चा सण अतिशय उत्साहात व आनंदात संपन्न

18मार्च 2018रोजी गुढीपाडव्या निमित्त महाराष्ट्र समाज,भद्र अहमदाबाद येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरूवातीला म. समाजाचे अध्यक्ष श्री. नारायण थोईटे यांनी उपस्थितांचे स्वागत केले व गुढीपाडव्याच्या शुभेच्छा दिल्या. तसेच दिवसभरातील कार्यक्रमांची माहिती दिली. या वर्षी समाजात 6गुढ्यांना सजवले होते. शृंगारसाज लेवून उभ्या केलेल्या 6ही गुढ्या खूप छान दिसत होत्या. नंतर या सहा ही गुढ्यांची शोभायात्रा 'जयश्रीराम'च्या जयघोषात वाजतगाजत प्रथम भद्रेतीस साईबाबा मंदिरात नेण्यात आली. तिथून देहाडराय राम मंदिरात नेण्यात आली. तिथे गुढ्यांची यथोचित पूजा करण्यात आली. गणपती मंदिरातही या गुढ्या नेण्यात आल्या. नंतर पुन्हा वाजतगाजत या गुढ्या म. समाजात आणल्यावर श्री. शरद देशपांडे यांच्या हस्ते त्यांची पुन्हा पूजा करण्यात आली. यावेळी 'मिडिया' ला आमंत्रित करण्यात आले होते.

याच वेळी 'मलाबार गोल्ड ॲन्ड डायमंड ज्वेलरी' तर्फे श्री. गौतमभाई व श्री. जावेदभाई यांनी 'लकी ड्रॉ' चे आयोजन केले होते. विजेत्यांना भेटवस्तू देण्यात आली. नंतर चहापान घेऊन सकाळच्या कार्यक्रमाचे समापन करण्यात आले. या दिवशी संध्याकाळीही एका शानदार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी श्री. महेश पाटोळे व सौ. स्मिता अभोजकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहिले होते. कार्यक्रमाच्या सुरूवातीला नाट्यविभाग सेक्रेटरी श्री. धवल वर्तक यांनी सर्वांचे स्वागत केले. क्षितिज पळसुले यांनी सर्वप्रथम गणेश वंदना म्हटली. नंतर निवेदिका सौ. स्मिता कोरडे यांनी सर्वांना गुढीपाडव्याच्या शुभेच्छा दिल्या. प्रसाद गोडबोले, क्षितिज पळसुले, प्रियंका वैद्य, गीतांजली ढोमसे, अजय कुळकर्णी यांनी नंतर अनेक उत्तमोत्तम गाणी गायली. सौ. स्मिता कोरडे यांनी स्वत: शब्दबद्ध केलेली 'शब्द' ही कविता सर्वांनाच खूप भावून गेली. सौ. राजश्री चितळे यांनी 'नाती' या विषयावर एक छानसा कार्यक्रमही सादर केला. पळसुले यांनी हार्मोनियमवर साथ दिली तर आदित्य वर्तक, धवल व वर्तक यांनी तबल्यावर साथ केली. नंतर साड्यांचे (गुढ्यांना लावलेल्या साड्या) लकी ड्रॉ, बक्षीससमारंभ झाले. आभार प्रदर्शन समाजाचे सेक्रेटरी श्री. हेमंत आगरकर यांनी केले. सौ. स्मिता कोरडे यांनी निवेदनाची जबाबदारी उत्तमपणे पार पाडली. ध्वनि संयोजनाचे काम श्री. अतुल जोशी यांनी केले. अल्पोहार होऊन या कार्यक्रमाचे समापन करण्यात आले.

## वर वधू परिचय मेळाव्याचे आयोजन

अखिल सौराष्ट्र महाराष्ट्रियन मंडळ व महाराष्ट्र समाज अहमदाबाद भद्र. यांच्या संयुक्त उपक्रमाने 8/4/18रोजी रविवारी सकाळी 10=00 वाजता गंगा गोविंद मंगल भवन लाल दरवाजा, येथे वर वधू परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुणे व अतिथी विशेष सौ.सुवर्णाताई राजेंद्र भान्डारकर व श्री अरुण कदम, महाराष्ट्र समाजाचे विश्वस्त डॉ. वाडेकर, उपाध्यक्ष श्री शैलेश शिंदे अखिल सौराष्ट्र महाराष्ट्रियन मंडळ चे अध्यक्ष डो.राजेश पाटील, कमलेश चव्हाण, सोनार साहेब यांना मंचावर आमंत्रित करून करण्यात. आले त्या नंतर श्री अशोक कापुरे यांनी मंचस्थ व सभागृहात उपस्थित सर्वांचे शाब्दिक स्वागत केले व पुष्पगुच्छ देऊन पाहुण्यांचे स्वागत केले व दीप प्रज्वलन पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. वाडेकर, श्री सोनार, श्री शिंदे यांनी कार्यक्रमाला अनुरूप आपले मंतव्य व्यक्त केले. मग वर वधू यांनी आपला परिचय दिला. कार्यक्रमात एकूण 184 मुला मुलींनी भाग घेतला होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री प्रकाश यादव व सौ.स्मिताताई कोरडे यांनी केले. कार्यक्रम उत्तम रित्या पार पाडला. त्या साठी सर्व संयोजकाचे, आयोजकांचे आभार. श्री अशोक कापुरे यांनी आभार मानल्यानंतर कार्यक्रम संपला. शेवटी सर्वांनीच सुरुची भोजनाचा आस्वाद घेतला.

## अपूर्वा गोखले, पल्लवी जोशी यांची मैफिल

**अहमदाबाद.** श्री सत्यनारायण दंगाईच यांच्यातर्फे गायक कलाकार भगिनी श्रीमती अपूर्वा गोखले आणि श्रीमती पल्लवी जोशी यांच्या सुरेख मैफिलीचे आयोजन निर्माण भवन लॉ गार्डन- अहमदाबाद येथे करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला श्री सत्यनारायण दंगाईच यांनी या कलाकार भगिनींचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. नंतर या संगीत मैफिलीला सुरुवात झाली. मध्यंतराच्या आधी भूप व जोग राग गायले तर मध्यंतरानंतर नायकी कानडा, मालकंस, सोहोनी तसेच कबीराचे भजन अत्यंत सुस्वरात गायले. उत्तरोत्तर ही मैफिल रंगतच गेली. भैरवी झाल्यानंतर या अत्यंत सुंदर मैफिलीची सांगता करण्यात आली. रसिक प्रेक्षकांच्या भरगच्च उपस्थितीत हा कार्यक्रम उत्तम रीतीने पार पडला.

## एका विदुषीचा नृत्यप्रवास

**बेंगळुरू.** महाराष्ट्र मंडळाने सुप्रसिद्ध भरतनाट्य नर्तकी डॉ. सुचेता भिडे चाफेकर यांच्याशी बातचीत व त्यांच्या नृत्याचा अतिशय सुंदर कार्यक्रम आयोजित केला. अत्यंत देखणा व सळसळ त्या उत्साहाने भारलेला तो नृत्याविष्कार पाहताना प्रेक्षक अगदी तल्लीन होऊन गेले होते. डॉ. भिडे-चाफेकर यांचे त्यांच्या नृत्य दृष्टीने उलगडत नेलेली भरतनाट्यम नृत्यशैलीची प्रगती कायम स्मरणात राहील. जेव्हां या विदुषीने स्वत: च्या वयाचा ७० वर्षे असा खुलासा केला तेव्हां आश्चर्याचा धक्का बसून त्यांच्या भुरळ पाडणाऱ्या नृत्य शैलीला प्रेक्षकांनी टाळ्यांच्या गजरात त्यांना मानवंदना दिली. डॉ. सुचेता भिडे-चाफेकर या पुणे आणि महाराष्ट्रात भरतनाट्यम नृत्यशैलीला प्रसिद्धी देणाऱ्या अनेक प्रणेत्यांपैकी एक प्रणेत्या आहेत. त्यांनी या शास्त्रीय नृत्याची आपल्या अत्यंत रसाळ, अर्थपूर्ण व प्रादेशिक भाषेत आपल्या भावदर्शी नृत्याने ओळख करून दिली. त्यांच्या या भरीव योगदानाला राज्य सरकारच्या 'महाराष्ट्र गौरव पुरस्कार' : व संगीत नाटक अकादमीच्या 'राष्ट्रीय पुरस्कार'ने गौरविले आहे.

## बालनाट्यशिबिराचे आयोजन

**अहमदाबाद.** (अशोक काकूरे) महाराष्ट्र समाज द्वारे बालनाट्यशिबिराचे आयोजन करण्यात आले होते, मुलामुलींचा उत्साह जोरात आहे, प्रसाद गोडबोले, हेमंत आगरकर, सुनयना पळसुले, क्षितिज पळसुले धवल वर्तक, मुलांकडून एकांकिका बसवून घेत असतानाची काही छायाचित्रे. या शिबिराचे समापन एका बहारदार कार्यक्रमाने होईल त्यात हे छोटे बालक कलाकार आपले कौशल्य पणाला लावून नाटक, नृत्य सादर करतील, त्या कार्यक्रमाला आपण सर्वांनी जरूर यावे, आणि बाल कलाकारांच्या पाठीवर कौतुकाची थाप द्यावी हीच इच्छा.

## राजधानीत वसंत साठे स्मृती समारोह संपन्न

**नवी दिल्ली.** कलासक्त, माजी केंद्रीय मंत्री वसंत साठे तथा बापू दिल्लीकरांचे लाडके आदरणीय व्यक्तिमत्व, इतकेच नव्हे तर सांस्कृतिक संबंध परिषदेचे माजी अध्यक्ष वसंत साठे यांच्या ९३व्या स्मृतिदिनानिमित्त राजधानी दिल्लीत पद्मश्री पंडित भजन सोपोरी आणि पुत्र अभय सोपारी यांच्या संतूरवादनाचा कार्यक्रम संपन्न झाला. लोधी रोडवरील इंडिया इंटरनॅशनल सेंटरच्या मुख्य सी.डी. देशमुख सभागृहात सोपोरी पिता-पुत्र यांच्या संतूरवादनातील जुगलबंदीने रसिकांना मंत्रमुग्ध केले. सोपोरी यांनी राग विभास, बंदिशी पंचम-षड्ज या कर्नाटकी ते कश्मिरी संगीतापर्यंतचा रागदारीतील प्रवास सहजतेने रसिकांसमोर उलगडून दाखवला. या वेळी वसंतातील सरस्वतीची अद्भुत रचना ही सोपोरी यांनी सादर केली. उत्तरोत्तर रसिकांच्या सक्रीय सहभागाने सोपोरींची मैफील अधिकच रंगत गेली. मैफिलीत थिरुवरन राजशेखरन यांनी घटम, पखवाजावर ऋषी शंकर उपाध्याय, उस्ताद अकरम खान यांनी तबल्याला साथसंगत केली. कार्यक्रमाला लोकसभा अध्यक्षा सुमित्रा महाजन, माजी मुख्यमंत्री शीला दीक्षित, कथक नृत्यांगना गुरू शोभना नारायण यांची विशेष उपस्थिती लाभली. अभय भावे यांनी सूत्रसंचालन केले. शशांक वर्टी यांना कार्यक्रमात श्रद्धांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बापूंची कन्या सुनीती बोधनकर, नात सुप्रिया साठे, उदय कुळकर्णी यांनी विशेष परिश्रम घेतले.

## मिलिंद महाजन, कार्याध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ यांच्या प्रयासास सुयश लाभले

**नवी दिल्ली/हैदराबाद.** बृहन्महाराष्ट्र मंडळाशी संलग्न संस्थांच्या समस्यांना उचित समाधान मिळवून देण्याच्या आपल्या ध्येयाला जागून नुकतेच झालेले कार्याध्यक्ष श्री मिलिंद महाजन यांनी आपल्या शिष्टमंडळा सह 'ओरिएन्टल कॉलेज-मराठी महाविद्यालय- हैदराबाद' ह्या संस्थे करिता केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री मा.ना. श्री प्रकाश जावडेकर यांची भेट घेतली होती.

मराठी महाविद्यालय- हैदराबाद याला कमी विद्यार्थी असल्याचे कारण दाखवून तेलंगण शासनाने नुकतेच मिळत असलेले अनुदान पूर्णपणे समाप्त केले होते.

कळविण्यास आनंद होत आहे कि श्री जावडेकरांकडून निर्देश मिळाल्या नंतर, संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी काल 05 जून ला तेलंगण राज्याचे शिक्षा मंत्री श्री कडीयम श्रीहरी यांना आपले ज्ञापन दिले. त्यावर श्री श्रीहरी यांनी शिक्षण आयुक्त, तेलंगणा प्रशासन यांना मराठी महाविद्यालयाचे अनुदान पुन: प्रारंभ करण्याचे निर्देश दिले. त्या संबंधी मराठी महाविद्यालयाच्या पदाधिकाऱ्यांनी शिक्षण आयुक्ताची भेट घेतल्यावर त्यांनी ह्या संबंधी मंत्र्यांचे आदेश मिळाल्याचे सांगितले आणि अनुदान पुन: बहाल करण्याची सूचना ही दिली. ओरिएन्टल कॉलेज-मराठी महाविद्यालय-हैदराबाद ह्यांचा वतीने अध्यक्ष आणि इतर पदाधिकाऱ्यांनी बृहन्महाराष्ट्र मंडळ नवी दिल्ली आणि विशेषत: कार्याध्यक्ष श्री मिलिंद महाजन यांचे विशेष आभार मानिले आहेत आणि मंडळाला धन्यवाद प्रेषित केले आहेत. संपूर्ण घटनाक्रमावर श्री मिलिंद महाजन यांनी संतोष व्यक्त केला आहे .

## इंदूर-मध्य प्रदेशमध्ये महाराष्ट्र साहित्य सभेचे शारदोत्सव

**इंदूर.** (सुरेश कुळकर्णी) इंदूर येथील प्रसिद्ध जाल सभागृहात दिनांक २९ मार्च २०१८ रोजी संध्याकाळी पुणे येथील प्रसिद्ध साहित्यिक मंगला गोडबोले यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र साहित्य सभेने आपला ५८ वा शारदोत्सव साजरा केला. प्रारंभी कविता पेंढारकर यांच्या निर्देशनात दिशा सुपेकर आणि योगिनी गद्रे यांनी 'माय मराठी' हे गीत सादर केले. तत्पूर्वी शारदोत्सवच्या अध्यक्ष मंगला गोडबोले, महाराष्ट्र साहित्य सभेचे न्यासी अशोक चितळे, मुख्य अतिथी हिमाचल प्रदेशचे पूर्व राज्यपाल न्यायमूती व्ही.एस. कोकजे, मध्यप्रदेश मराठी अकादमी व महाराष्ट्र साहित्य सभेचे अध्यक्ष अश्विन खरे यांनी दीप प्रज्ज्वलन व सरस्वती चित्रावर माल्यार्पण केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इंदूर नगर निगमच्या पार्षद विनिता धर्म यांनी केले. मंगला गोडबोले यांचा परिचय अपर्णा भागवत यांनी करून देताना मंगला गोडबोले यांच्या साहित्याचे यथासांग विवेचन, त्यांच्या अष्टपैळू व्यक्तित्वावर विशेष प्रकाश टाकला. त्यांना मिळालेल्या पुरस्कारांवरही चर्चा केली.

